www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ राज्यातील कामगारांच्या सर्वांगीण विकासासाठी...
पान ३ वर....

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ संग्रहालयांच्या माध्यमातून सांस्कृतिक श्रीमंतीचे दर्शन...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ
■ वर्ष - ०२ ■ अंक २१४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार, ०९ जानेवारी २०२५ ■ रु. २/-
■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# युवकांनो... "ड्रग्स फ्री समाज घडविण्यासाठी सैनिक म्हणून पुढे या..! -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते "नशामुक्त नवी मुंबई" अभियानाचे उद्घाटन संपन्न




● नवी मुंबई, भावना जैन :

देशाचे आणि समाजाचे नुकसान करीत असलेल्या न दिसणाऱ्या शत्रूशी लढण्यासाठी समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. ड्रग्स व तत्सम अंमली पदार्थांच्या माध्यमातून काही लोक समाज पोखरण्याचे दुष्कर्म करीत आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी सजग राहा, सैनिक म्हणून पुढे या.. हीदेखील एक प्रकारची देशभक्ती आणि समाजाची सेवा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आज नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित नवी मुंबई, वाशी येथील सिडको ऑडिटोरियम येथे "नशामुक्त नवी मुंबई" अभियानाचे उद्घाटन संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी वनमंत्री गणेश नाईक, प्रख्यात अभिनेता आणि "नशामुक्त नवी मुंबई" या उपक्रमाचे आयकॉन जॉन अब्राहम, आमदार मंदा म्हात्रे, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, विधानपरिषद सदस्य विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, संजय येनपुरे, पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, प्रशांत मोहिते, रश्मी नांदेडकर, संजयकुमार पाटील, महाविद्यालयीन विद्यार्थी, नशामुक्तीचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आदी उपस्थित होते.
पान २ वर




## ⟬⟭ थोडक्यात ⟬⟭



### बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अडचणीत वाढ!

नवी दिल्ली : बांगलादेशाच्या अंतरिम सरकारने माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा पासपोर्ट रद्द केल्याची माहिती समोर येत आहे. बांगलादेशातील विद्यमान अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनुस यांच्या नेतृत्वाखाली हा निर्णय घेण्यात आल्याचे समजते आहे. शेख हसीना यांच्यासह आणखी ९७ जणांचे पासपोर्ट रद्द करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, शेख हसीना आणि त्यांच्या समर्थकांची नावे असलेल्या अनेक गुन्हेगारी प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर युनुस सरकारकडून हे पाऊल उचलण्यात आले आहे. शेख हसीना यांच्यासह एकूण ९७ जणांचे पासपोर्ट रद्द करण्यात आले आहेत. त्यापैकी २२ जणांवर कथित अपहरणात सहभाग असल्याचा आरोप आहेत, तर इतर ७५ जणांवर जुलै २०२३मधील विद्यार्थीविरोधी आंदोलनादरम्यान हत्येचा आरोप आहे. ६ जानेवारी रोजी बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाधिकरणाने शेख हसीना यांच्या अटकेचा वॉरंट जारी केला आहे. त्यांना फेब्रुवारी २०२५पर्यंत न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### इस्त्रोचे नवे अध्यक्ष - डॉ. व्ही. नारायणन




नवी दिल्ली : भारतीय अंतराळ संशोधन संस्था च्या नव्या अध्यक्षांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. १४ जानेवारी रोजी डॉ. व्ही. नारायणन इस्त्रोच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारतील. मंगळवार, दि. ७ जानेवारी रोजी यासंदर्भातील अधिसूचना जारी करत माहिती देण्यात आली आहे. डॉ. व्ही. नारायणन यांनी चार दशकांच्या कारकिर्दीत इस्त्रोमध्ये अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. डॉ. नारायणन यांचे वैशिष्ट्य रॉकेट आणि स्पेसक्राफ्ट प्रोपल्शनमध्ये आहे.

### काका नराधम बनला, मुलीसमान पुतणीवर बलात्कार केला



मुंबई : मुंबईतील चेंबूरमध्ये मनाला हादरवून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. चुलत्याने १५ वर्षीय मुलीला गुंगीचे औषध टाकून बलात्कार केला. चुलता इतक्या खालच्या स्तराला गेला की त्याने अत्याचाराचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला. चेंबूरमधील वाशीनाका परिसरात हा धक्कादायक प्रकार घडला. ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. नराधम चुलत्याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.चेंबूरमध्ये १५ वर्षीय मुलीच्या शितपेयात गुंगिचं औषध टाकून बेशुद्धावस्थेत चुलत काकाने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

## मुंबईत आढळला एचएमपीव्हीचा पहिला रुग्ण

### सहा महिन्यांच्या बाळाला विषाणूची लागण



● मुंबई, विशाल पाटील :


पवईमध्ये हिरानंदानी रुग्णालयात बुधवार (८ जानेवारी) मुंबईतील ह्युमन मेटाप्युमो व्हायरसचा पहिला रूग्ण अढळला असून, सहा महिन्यांच्या बाळाला याची लागण झाल्याचे चाचणीतून स्पष्ट झाले आहे. खोकला आणि ऑक्सिजनची पातळी ८४ टक्क्यांपर्यंत खाली घसरल्याने या बाळाला १ जानेवारी रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान रुग्णालयाची डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार या विषाणूवर कोणतेही विशिष्ट उपचार नसल्यामुळे बाळावर आयसीयूमध्ये ब्रॉन्कोडायलेटर्सच्या लक्षणांवर उपचार सुरू करण्यात आले आहेत. पवईतील हिरानंदानी रुग्णालयातील डॉक्टरांनी मंगळवारी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी स्थानिक प्रशासनाला १ जानेवारी रोजी एचएमपीव्ही रुग्णाबाबत कल्पना दिली होती.
पान २ वर

### केंद्र सरकारकडून खबरदारी

■ चीनमध्ये सध्या ह्युमन मेटान्यूमो व्हायरसचा (एचएमपीव्ही) उद्रेक सुरू असल्याने, देशातही याला विषाणूला रोखण्यासाठी खबरदारी घेतली जात आहे. यादरम्यान इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) नेटवर्क लॅबोरेटरीजच्या नियमित तपासणी दरम्यान देशातील काहींना या विषाणूची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. आरोग्य मंत्रालयाने काही दिवसांपूर्वी चीनमधील परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी एक संयुक्त पाहाणी पथकाची स्थापना केली आहे. हे पथक जागतिक आरोग्य संघटनेकडून वेळोवेळी चिनमधील परिस्थितीबद्दल माहिती घेत आहे.

## बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी नॅशनल हायवेवर तिसऱ्या पुलाचे काम पूर्ण

● मुंबई, विशाल कारंडे :



प्रतिनिधी भारतातील पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी एनएचएसआरसीएलच्या माध्यमातून रेल्वे अहोरात्र काम करत आहे. नुकताच मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी गुजरातमधील NH-४८ वर २१० मीटर लांबीच्या पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असल्याची माहिती नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने दिली आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील पंचलाईजवळील वाघलधारा गावात राष्ट्रीय महामार्ग-४८ (दिल्ली-चेन्नई) ओलांडण्यासाठी २१० मीटर लांबीच्या प्री-स्ट्रेस्ड काँक्रीट पुलाचे बांधकाम २ जानेवारी २०२५ रोजी पूर्ण झाले. या पुलामध्ये ७२ प्रीकास्ट सेगमेंट आहेत आणि त्याचा विस्तार ४०मीटर + ६५ मीटर + ६५ मीटर + ४० मीटर आहे. हे संतुलित कँटिलीव्हर पद्धती वापरून तयार केले आहे, जे मोठ्या स्पॅनसाठी योग्य आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडॉरचे काम नोव्हेंबर २०२१मध्ये सुरू झाले आणि तेव्हापासून या प्रकल्पावर सातत्याने काम सुरू आहे. या मार्गावरील पहिला ५० किमीचा भाग - बिलीमोरा ते सुरत - ऑगस्ट २०२६पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
पान २ वर

## वक्फ बोर्डाने बळकावलेली एकेक इंच जमीन परत घेणार - योगी आदित्यनाथ

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



उत्तर प्रदेशमध्ये महाकुंभमेळ्याच्या तयारीला वेग आला आहे. अशातच या कुंभमेळ्याला मुस्लिम व्यक्तींवर बंदी घालण्यात आली असून यावरून महाकुंभमेळ्याची जमीन ही वक्फ बोर्डाची असल्याचा दावा मौलवींनी केल्याने वादास तोंड फुटले आहे. यावर आता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मोठी घोषणा केली आहे.

वक्फच्या नावावर कब्जा केलेली एकेक इंच जमीन राज्य सरकार काढून घेणार आहे. हे वक्फ बोर्ड आहे की भूमाफिया बोर्ड हेच सांगता येणार नाही, असे योगी आदित्यनाथ म्हणाले. राज्य सरकारने वक्फ बोर्डाच्या नियमांत बदल केला आहे. आता त्यांच्या ताब्यात असलेली जर्व जमीन तपासली जात आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

वक्फ बोर्डाच्या नावावर हडपलेली सर्व जमीन सरकार ताब्यात घेईल आणि त्याचा वापर गरीबांसाठी घरे, शाळा, कॉलेज आणि हॉस्पिटल बांधण्यासाठी केला जाईल, असे ते म्हणाले. सनातन धर्माची प्रतिमा ही आकाशापेक्षा उंच आणि समुद्रापेक्षा खोल आहे. सनातन धर्माची तुलना कोणत्याही संप्रदाय किंवा धर्माशी केली जाऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले. तसेच कुंभाची परंपरा वक्फपेक्षा खूप प्राचीन असल्याचे म्हटले आहे.
पान २ वर

## कोकणातील अवैध मासेमारी रोखण्यासाठी अत्याधुनिक ड्रोन प्रणालीचा वापर

### जिल्ह्यातील वरसोली बीच व मुळगांव जेट्टी येथून ड्रोन प्रणालीचे उड्डाण

● रायगड, फरीद डावरे



कोकणातील अवैध मासेमारी रोखण्यासाठी अत्याधुनिक ड्रोन प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. रायगडसह कोकणातील सात जिल्ह्यात सात ड्रोन कंट्रोल रुम्सच्या माध्यमातून नऊ अत्याधुनिक ड्रोनची नजर राहणार आहे. अशा पध्दतीची आधुनिक यंत्रणा राज्यात प्रथमच अमलात येत असून जिल्ह्यातील वरसोली बीच येथील क्रिकेट मैदान, ता.अलिबाग व मुळगांव जेट्टी, मुळगांव, ता.श्रीवर्धन येथून ड्रोन प्रणालीचे उड्डाण करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय संजय पाटील यांनी दिली. आहे. महाराष्ट्र राज्याच्या जलधीक्षेत्रात होत असलेली अवैध मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारीत २०२१) हा कायदा अंमलात आला आहे. या सागरी मासेमारी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता विभागाकडे असलेल्या गस्ती नौकांमार्फत गस्त घालून कार्यवाही करण्यात येत असते. गस्ती नौकेद्वारे समुद्रात गस्त घालत असताना प्रत्येक नौकेची तपासणी करणे शक्य होत नाही तसेच अनधिकृत नौकांचा पाठलाग करीत असताना त्या पळून जात असतात. अशा नौकांना पकडणे जिकरीचे होत असते.
पान २ वर

## पालघर विमानतळ उभारणीसाठी प्रक्रिया सुरु करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



● पालघर, सुचिता सोनावणे:

प्रतिनिधी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह नागपूर, शिर्डी विमानतळांची कामे गतीने करून दिलेल्या मुदतीत ही विमानतळे कार्यान्वीत व्हावीत, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सर्व विमानतळांच्या बांधकाम प्रगतीच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी त्यांनी प्रस्तावित पालघर विमानतळ उभारणीसाठी प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देशही बैठकीवेळी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यातील सर्व विमानतळांच्या बांधकाम प्रगतीच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या सहसचिव रुबिना अली, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आदी उपस्थित होते.
पान २ वर

### बैठकीदरम्यान झालेले महत्वाचे निर्णय

- ■ सोलापूर आणि कोल्हापूर विमानतळ येथे नाईट लँडिंगची व्यवस्था करणे
- ■ शिर्डी विमानतळावर नाईट लँडिंग व्यवस्था तातडीने सुरु करणे
- ■ नागपूर आणि शिर्डी विमानतळाचे प्रलंबित प्रश्न ३१ मार्चपर्यंत सोडवण्याचे निर्देश
- ■ जळगाव विमानतळ येथे नवीन टर्मिनल इमारत तयार करा
- ■ पुरंदर विमानतळासाठी जमीन अधिग्रहण प्रक्रिया लवकर सुरू करण्याचे आदेश
- ■ पालघर विमानतळ उभारणीसाठी प्रक्रिया सुरू करा
- ■ वाढवण येथील प्रस्तावित नवीन विमानतळाबाबत तात्काळ निर्णय घ्या

## पीओपी ऐवजी शाडू मातीच्या मूर्ती बनवाव्यात पुणे महापालिकेच्या मूर्तिकारांना सूचना

● पुणे, अभिजित येरल्लू :



पर्यावरणास घातक असलेल्या प्लास्टर ऑफ पॅरीस (पीओपी) पासून बनविलेल्या मूर्तीवर न्यायालयाने बंदी घातली आहे. त्यामुळे अद्याप गणपतीच्या मूर्ती तयार करण्याचे काम सुरू झालेले नाही. त्यामुळे पीओपीला पर्याय म्हणून शाडू माती, कागद, तसेच इतर पर्यायांचा वापर करावा, अशा सूचना महापालिकेने मूर्तिकारांना दिल्या आहेत.
पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२० मध्ये मूर्ती बनविणारे कारागीर आणि उत्पादकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहे.मात्र, गेल्या चार वर्षांत गणेशोत्सवाच्या काही दिवस आधी याबाबतचे आदेश काढले जात असल्याने तोपर्यंत वेळ निघून जाते. त्यामुळे महापालिकेने यंदा नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच शहरातील मूर्तिकारांची बैठक घेत या निर्णयाची माहिती दिली. शहरातील २५ ते ३० मूर्तिकार या बैठकीस उपस्थित होते. या वेळी त्यांच्याही अडचणी महापालिकेने ऐकून घेऊन त्या सोडविण्याचे आश्वासनही दिल्याचे पर्यावरण विभागाचे उपायुक्त संजय शिंदे यांनी सांगितले.
पान २ वर

## संपादकीय

# बिर्लांचा कोटासाठी 'कोटा'

लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला हे मोजक्या नेत्यांच्या श्रेणीत जाऊन बसलेले आहेत. याआधीही पाच नेत्यांनी सलग दोन वेळा लोकसभाध्यक्ष पद भूषवलं होतं. पण, सलग दहा वर्ष पूर्ण करणारे एकमेव नेता होते काँग्रेसचे बलराम जाखड. बिलांनी अजून दहा वर्षे पूर्ण केलेली नसली तरी ते जाखड यांच्या रांगेत जाऊन बसू शकतात. बिर्ला दुसऱ्यांदा लोकसभाध्यक्ष झाले तेव्हा मोदी म्हणाले होते की, लोकसभाध्यक्ष पद हे असं आसन आहे की, तिथं बसून कारभार करणं म्हणजे तारेवरील कसरत आहे. सभागृह सांभाळताना स्वपक्षाच्या सदस्यांनाही दुखवावं लागतं. त्यामुळे सलग दुसऱ्यांदा एकाच लोकसभा मतदारसंघातून निवडून येणं अवघड असतं. बिलांनी हे अवघड काम करून यशस्वी केलेलं आहे बिर्ला सलग तीन वेळा राजस्थानच्या विधानसभेचे सदस्य झाले. त्यानंतर आता लोकसभेचेही ते सलग तिसऱ्यांदा सदस्य बनले आहेत. २०२९ मध्येही ते कोटा लोकसभा मतदारसंघातून उभं राहू शकतात. लोकसभाध्यक्ष पद भूषवताना निवडून येण्यासाठी किती कष्ट करावे लागतात हे बिलांना माहीत असल्यानं त्यांनी आत्तापासून कोटा मतदारसंघाकडं लक्ष द्यायला सुरुवात केलेली आहे. गेल्या वेळीही त्यांनी कोटाशी उत्तम संपर्क ठेवलेला होता. पण, पाच वर्षांच्या ताज्या सदस्यत्वामध्ये बिलांनी कोटाकडं अधिक लक्ष द्यायचं ठरवलेलं असावं असं दिसतंय. बिर्ला सातत्याने कोटा मतदारसंघामध्ये जाताना दिसतात. रात्री रेल्वेचा प्रवास करून सकाळी चार-पाच वाजता कोटामध्ये पोहोचल्यावर बिलांचे सकाळी आठ वाजल्यापासून जनसंपर्काचे कार्यक्रम सुरू होतात. सार्वजनिक समारंभ आटोपून ते त्याच रात्री दिल्लीला परत येतात. दिल्लीतही बिलांचं कामकाज घरातून होत नाही. संसदेचं अधिवेशन नसलं तरी बिर्ला संसदेच्या कार्यालयात असतात. संसदेबरोबरच कोटा मतदारसंघ सांभाळणं बिलांसाठी अत्यंत आवश्यक आहे, तरच चौथ्यांदा मतदार संधी देतील. त्यामुळे कदाचित बिलांनी दुसऱ्या कालखंडातील खासदारकीच्या पहिल्या वर्षातच कोटासाठी वेळेचा 'कोटा' राखून ठेवला असल्याचं दिसतंय. मराठा सरदार महादजी शिंदेचं राजघराणं आणि त्यांचं राजपौरोहित्य करणारं शेंडे घराणं या दोन घराण्यांच्या ऋणानुबंधावर प्रकाश टाकणारं 'प्रकाशाकडून प्रकाशाकडं स्थलांतर व स्थित्यंतर शेंडे घराण्याचा बहुआयामी प्रवास' या पुस्तकाचं प्रकाशन दिल्लीत केंद्रीयमंत्री व शिंदे घराण्याचे वारसदार ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते झालं. पत्रकार-लेखक दत्ता जोशी आणि डॉ. राजेंद्र शेंडे यांनी हे पुस्तक लिहिलेलं आहे. ज्योतिरादित्य यांचे वडील माधवराव काँग्रेसमध्ये होते, ज्योतिरादित्य आता काँग्रेसमधून भाजपमध्ये आले आहेत! शिंदे-शेंडे घराण्यांच्या नातेसंबंधांवरील हे पुस्तक एकप्रकारे मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास अधोरेखित करणारा आहे, असं ज्योतिरादित्यांचं म्हणणं होतं. भारताचा इतिहास लिहिताना मराठ्यांचा इतिहास दडपला गेला होता. पोर्तुगीज, ब्रिटिश, मुघल अशा वसाहतवाद्यांचा इतिहास अधिक लिहिला गेलाय पण, मराठ्यांच्या इतिहासाला न्याय मिळालेला नाही आता भारताचा इतिहास नव्यानं लिहिला जातोय, पुढील शंभर वर्षांच्या इतिहासाचं लेखन आत्ता सुरू झालंय, असं ज्योतिरादित्यांना सुचवायचं होतं. ज्योतिरादित्यांचं म्हणणं होतं की, शिंदे-शेंडे घराण्यावरील पुस्तकानं मराठ्यांच्या इतिहासाला संस्थात्मक रूप प्रदान केलं आहे. ते खरंही असेल. २०१४ नंतर भारताच्या प्राचीन अर्वाचिन इतिहासाचं लेखन केलं जातंय. हे पुस्तकदेखील त्याचाच भाग असल्याचं म्हणता येऊ शकतं शिंदे आणि शेंडे घराण्यांचे नातेसंबंध आजही टिकून आहेत. आजही शिंदे राजघराण्याचं राजपौरोहित्य शेंडे कुटुंबाकडून केलं जातं. संचारभवनातील शिंदेच्या कार्यालयात झालेल्या या सोहळ्याच्या स्वागतपत्रिकेवर, 'ज्योतिरादित्य सिंधिया' यांच्या हस्ते प्रकाशन लिहिलेलं होतं. खरंतर ते 'शिंदे' असंच लिहायला हवं होतं. ही चूक ज्योतिरादित्यांनी अचूक हेरली. आम्ही शिंदेच आहोत. महाराष्ट्रात आम्हाला कोणी सिंधिया म्हणत नाही, तुम्हीही इथं शिंदेच लिहायला हवं होतं, असं म्हणत ज्योतिरादित्यांनी 'मराठी बाणा' दाखवला. ज्योतिरादित्य मराठी बोलत असल्यानं हा सगळा संवाद मराठीतून होत होता हे विशेष. शेंडे घराण्याला दिलेल्या सनदीसंदर्भात बोलताना ज्योतिरादित्य म्हणाले, ही सनद मोडी लिपीत आहे नंतर ते म्हणाले, हे तर सगळं मोदी लिपीतच आहे त्यांना मोडी म्हणायचं होतं की खरंच मोदी? काही गोष्टी गुपित राहिलेल्या बऱ्या भाजपसाठी महाराष्ट्र आणि हरियाणाच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल आश्चर्यकारकरीत्या आनंददायी होते. हरियाणा आपण जिंकू शकू असं भाजपच्या नेत्यांना वाटत नव्हतं. तिथं भाजपसाठी निवडणुकीचं काम करणारे संघाचे नेते भाजपला, तुम्ही जिंकू शकता, असं सांगत होते. भाजपच्या काही नेत्यांच्या म्हणण्यानुसार, संघाने हरियाणा पिंजून काढला होता. संघामुळे हरियाणा भाजपला जिंकता आला. त्याची पुनरावृत्ती महाराष्ट्रात झाली असं मानलं जातंय. कोणी म्हणतं संघाने महाराष्ट्रातील निवडणूक ताब्यात घेतली होती. संघाच्या नेत्यांना विचारून भाजपचे उमेदवार निश्चित केले गेले. महाराष्ट्रात भाजपने प्रचंड विजय मिळवल्यामुळे संघाची सक्रियता मान्य करावी लागू शकते. महाराष्ट्रात संघाने वरिष्ठ स्तरावर निर्णयप्रक्रियेमध्ये सहकार्यवाह दर्जाच्या नेत्याची नेमणूक केली होती. मतदारसंघानिहाय संघाने वेगवेगळ्या नेत्यांना पाठवून बुध स्तरावर काम केलेलं होतं. महाराष्ट्रात संघाने एक लाख बैठका घेतल्या. म्हणजे प्रत्येक मतदान केंद्रनिहाय संघाने बैठक घेतली. आपल्या मतदारांशी थेट संपर्क करणं, त्यांना मतदानासाठी घरातून मतदान केंद्रापर्यंत पोहोचवणं ही सगळी प्रक्रिया संघ परिवारातील संघटना आणि त्यांच्या कार्यकत्यांच्या मदतीने भाजपने घडवून आणली असं म्हणता येईल. भाजपने मतदारसंघांचे अ, ब, क आणि ड असे चार वेगवेगळे स्तर केलेले होतेच. क आणि ड हे मतदारसंघ कमकुवत होते. प्रामुख्याने या दोन विभागांतील मतदारसंघांमध्ये मतांचा टक्का दहा टक्क्यांपेक्षा जास्त वाढवण्याचं उद्दिष्ट होतं. त्यातही संघ आणि भाजपनं ओबीसी अंतर्गत विविध जातसमूहांशी थेट संवाद साधला होता. सुमारे ३५० ओबीसी जातींपैकी दीडशेहून अधिक ओबीसी जातींच्या नेते-कार्यकत्यांशी संपर्क साधण्यासाठी भोजनाचे कार्यक्रम आयोजित केले गेले.

# जीवघेणा नायलॉन मांजा

जानेवारी महिना उजाडला की सर्वांना वेध लागतात ते मकर संक्रांत या सणाचे. मकर संक्रांत हा हिंदू धर्मातील सर्वात महत्वाचा सण मानला जातो. मकर संक्रांतीनिमित्त पंतगोत्सव साजरा करण्याची आपल्याकडे खूप जुनी परंपरा आहे. रंगीबेरंगी पतंग आकाशात उडवून हा उत्सव साजरा केला जातो. लहानांपासून मोठयांपर्यंत सर्वचजण पतंग उडविण्याचा आनंद यानिमित्ताने लुटत असतात पण अलीकडे हा खेळ जीवघेणा ठरत आहे. पतंग उडविण्यासाठी पूर्वी साधा सुती दोरा वापरला जात होता मात्र काही वर्षांपासून पतंग उडविण्यासाठी चिनी किंवा नायलॉन मांजाचा वापर केला जातो आणि हाच नायलॉन मांजा आता जीवघेणा ठरत आहे. मागील आठवड्यात पुण्यातील वारजे, धनकवडी आणि कात्रज - कोंडवा परिसरात दुचाकी वरून जाणाऱ्या व्यक्तींच्या गळ्याला नायलॉन मांजा कापल्याने दुखापत झाल्याची घटना घडल्या. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणून त्यांचा जीव वाचला अर्थात सर्वांचेच नशीब बलवत्तर असते असे नाही. मागील वर्षी दुचाकीवरून जाताना नायलॉन मांजाने गळा चिरून पोलीस हवालदाराचा मृत्यू झाल्याची बातमी नुकतीच वाचण्यात आली होती. अर्थात नायलॉन मांजाने गळा चिरून निष्पाप नागरिकाचा मृत्यू झाल्याची टी पहिलीच बातमी नव्हती दरवर्षी अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतात. दौंडमध्येही दोन वर्षी अशाच प्रकारे एका दुचाकी स्वाराचा बळी गेला



होता. तीन वर्षापूर्वी पुण्यात एका तरुणीला ही अशाच प्रकारे दुर्दैवी मृत्यू आला होता. केवळ पुण्यात नाही तर नाशिकमध्येही अशीच घटना घडली होती त्यातही एका महिलेचा नायलॉन मांजाने गळा चिरून दुर्दैवी मृत्यू झाला होता. अर्थात हे प्रातिनिधिक उदाहरणे आहेत अशाप्रकारे नायलॉन माजांने राज्यात अनेक निष्पापांना आपला जीव गमवावा लागला आहे. या मांजामध्ये अडकून आकाशात मुक्तविहार करणारे पक्षीही जखमी होतात काही पक्षी मृत्यू पावतात. चिनी बनावटीचा हा मांजा नायलॉन धागा, काचेचा चुरा, लोखंडाचे कण आणि रासायनिक पदार्थांपासून बनवला जातो. हा मांजा माणसांसोबत पक्षी आणि प्राण्यांसाठी देखील घातक आहे. वास्तविक नायलॉन मांजाचा खरेदी विक्रीवर बंदी घालण्याचे आणि वापराबाबत प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. मांजामुळे पशूपक्षांना होणाऱ्या दुखापतीच्या संदर्भात पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाने राज्य सरकारला पत्र पाठवले होते. नायलॉन मांजामुळे वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम १९७२ च्या अनुसूचितील वन्यप्राणी व पक्षांचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांना दुखापत झाल्यास वन कायद्याच्या कलम ९ नुसार कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते त्यामुळे नायलॉन मांजाच्या विक्रीवर महाराष्ट्र सरकारने बंदी घातलेली असतानाही हा मांजा दुकानात सर्रास विकला जात आहे तरीही विक्रेत्यांवर कारवाई होताना दिसत नाही. काही ठिकाणी प्रशासनाने कारवाई केल्याच्या बातम्या आल्या ही समाधनाची बाब असली तरी कारवाईत सातत्य नाही. जो मांजा दुकानात विकण्यासाठी येतो तोच मांजा प्रशासनाला कसा मिळत नाही? आणखी किती बळी गेल्यावर प्रशासनाला जाग येणार आहे ? प्रशासनाने नायलॉन मांजा विरोधात धडक मोहीम राबवायला हवी. नायलॉन मांजा विकणारा आणि खरेदी करणारा अशा दोघांवरही कारवाई व्हायला हवी. नागरिकांनीही नायलॉन मांजाने पतंग उडविण्याऐवजी साध्या सुती दोरीचा वापर करून पतंग उडवावी आणि हा सण साजरा करावा. **-श्याम ठाणेदार, पुणे**

# पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड महामार्गाच्या भूमिपूजनाला लवकरच मुहूर्त, उद्या मुख्यमंत्र्यांच्या आढावा बैठकीत निर्णयाची शक्यता

**मुंबई (विशाल कारंडे) :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) महत्त्वाकांक्षी अशा पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड द्रुतगती महामार्ग प्रकल्पाच्या भूमिपुजनाची तारीख निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. उद्या, गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे एमएसआरडीसीच्या प्रकल्पांचा आढावा घेणार आहेत. या आढावा बैठकीत या दोन्ही प्रकल्पाच्या भूमिपुजनाची तारीख मुख्यमंत्र्यांकडून निश्चित केली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी एमएसआरडीसीने १६८ किमीचा पुणे वर्तुळाकार




रस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. तर दुसरीकडे समृद्धी महामार्गाचा विस्तार नांदेडपर्यंत करण्याकरीता जालना-नांदेड असा १८० किमीचा द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही प्रकल्पाच्या बांधकामासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कंत्राटदारांना कार्यादेशही देण्यात आले आहेत. कार्यादेश देऊन बरेच दिवस झाल्याने या प्रकल्पांचे भूमिपूजन केव्हा होणार आणि कामास सुरुवात केव्हा होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. असे असताना आता लवकरच भूमिपूजनाची प्रतीक्षा संपण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एमएसआरडीसीची एक आढावा बैठक गुरुवारी घेणार आहेत.

## पान १ वरून...

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते...

"Art of silence" या मूकनाट्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तर या उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते "नशामुक्त नवी मुंबई" अभियानाच्या चित्रफितीच्या प्रकाशनाने संपन्न झाले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस पुढे म्हणाले की, ड्रग्समुळे स्वतःच्या आयुष्यासोबत आपण देशाचेही नुकसान करतो हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. प्रवाहासोबत जाणारे अनेक असतात, परंतू चांगले करण्यासाठी प्रवाहाविरुद्ध जावे लागते, त्यासाठी शारीरिक ताकदीपेक्षा मानसिक ताकद गरजेची आहे. "नशामुक्त नवी मुंबई" हे अभियान अतिशय महत्वाचे आहे. गृह खात्याच्या पहिल्याच बैठकीत पोलिसांना सांगितले की, आपल्याला ड्रग्स विरुद्ध मोठी लढाई लढायची आहे. सरळ लढाई करता येत नाही म्हणून अंमली पदार्थांच्या देश पोखरण्याचा प्रयत्न केला जातोय.

ते म्हणाले, देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी गृह विभागासंबंधी घेतलेल्या बैठकीत कॅनडाचे उदाहरण दिले. ड्रग्जमुळे कॅनडा सामाजिकदृष्ट्या पूर्णपणे कोलमडून पडला. मात्र भारत ड्रग्जविरूद्धची ही लढाई जिंकू शकतो. देशातील सर्व राज्यांनी एकमेकांना सहकार्य करीत ही लढाई एकत्र लढायला हवी. सर्वांनी एकत्र येवून संपूर्ण भारत ड्रग्स मुक्त करायचा आहे, हा आपला निर्धार असायला हवा. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या ८८२८ ११२ ११२ या टोल फ्री क्रमांकाचा प्रभावी वापर करा.

शेवटी श्री.फडणवीस यांनी नशामुक्तीसाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल नवी मुंबई पोलीस दलाचे अभिनंदन केले. तसेच सेलिब्रिटी म्हणून जॉन अब्राहम यांच्या कामाबद्दलही कौतुक केले. आणि पुन:श्च एकदा निर्धार करु या नशामुक्तीसाठी लढण्याचा, "ड्रग्स फ्री नवी मुंबई" करण्यासाठी सैनिक होण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

अभिनेता जॉन अब्राहम यांनी आपल्या मनोगतात "नशामुक्त नवी मुंबई" या अभियानाच्या आयोजनाबद्दल नवी मुंबई पोलिसांचे अभिनंदन करून आपले आयुष्य हे शिस्तमय असावे. आपण आपल्या आचरणाने मित्र परिवारामध्ये आदर्श निर्माण करावा आणि एक उत्तम नागरिक म्हणून जगावे, असे आवाहन उपस्थित युवकांना केले.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, चांगल्या कामाचा ध्यास, हीच खरी नशा आहे. सर्वांनी चांगल्या कामाचा ध्यास घ्यावा. नवी मुंबई महानगरपालिका सर्व आघाड्यांवर प्रथम क्रमांकावर आहे. तसेच नशामुक्त अभियानातही अव्वल राहील, हा विश्वास आहे.

सुरुवातीस नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी आपल्या प्रास्ताविकात नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने आतापर्यंत राबविलेल्या विविध उपक्रमांची थोडक्यात माहिती दिली.

### मुंबईत आढळला एचएमपीव्ही चा पहिला रुग्ण

परंतु परळ येथील बीएमसीच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांना अद्याप असा कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही. याबाबत टाईम्स ऑफ इंडियाने वृत्त दिले आहे.

२००१ पहिल्यांदा शोध

ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) हा आरएनए विषाणू आहे. २००१ मध्ये डच संशोधकांनी सर्वात पहिल्यांदा याचा शोध लावला होता. या विषाणूमुळे श्वसनासंबंधी आजार होतात. संशोधनातून असे समोर आले होते की, या विषाणूचा किमान सहा दशकांपासून प्रसार होत आहे. याला आता जागतिक स्तरावर प्रचलित श्वसन रोगजनक म्हणून ओळखले जाते. एचएमपीव्ही प्रामुख्याने खोकताना आणि शिंकताना पसरतो. सीडीडी या चिनी संकेतस्थळानुसार 'एचएमपीव्ही'चा संसर्ग कालावधी तीन ते पाच दिवसांचा असतो. हा विषाणू हिवाळा आणि वसंत ऋतूच्या महिन्यांत जास्त प्रमाणात आढळतो.

एचएमपीव्ही ची लक्षणे

ह्युमन मेटापन्यूमो व्हायरसमध्येही (एचएमपीव्ही) सामान्य सर्दी आणि कोरोनासारखी लक्षणे दिसून येतात. त्यामध्ये खोकला, ताप व सर्दी यांसारख्या लक्षणांचा समावेश आहे. कोविड-१९ नंतर पाच वर्षांनंतर चीनच्या अनेक भागांमध्ये ह्युमन मेटापन्यूमो व्हायरसचा (एचएमपीव्ही) प्रादुर्भाव वाढत आहे.

### बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी नॅशनल हायवेवर...

यादरम्यान सुरत आणि बिलीमोरा बुलेट ट्रेन स्थानकांदरम्यान नवसारी जिल्ह्यात NH-४८ ओलांडणारे दोन पूल आधीच पूर्ण झाले आहेत. या पुलांची लांबी अनुक्रमे २६० मीटर आणि २१० मीटर आहे. वाघलधाराजवळ हा नव्याने बांधलेला पूल वापी आणि बिलीमोरा बुलेट ट्रेन स्थानकादरम्यान आहे. NH-४८ हा भारतातील सर्वात व्यस्त महामार्गांपैकी एक आहे. हे लक्षात घेत वाहने आणि कामगार दोघांच्याही सुरक्षिततेसाठी वाहतूक प्रवाह राखून आणि सार्वजनिक गैरसोय कमी करण्यासाठी बांधकाम काळजीपूर्वक नियोजित केले गेले. बांधकामादरम्यान, हायवेच्या दोन्ही बाजूला अतिरिक्त लेन बांधण्यात आल्या होत्या. महामार्गावरील वाहतुकीत कोणताही व्यत्यय येऊ नये म्हणून टप्प्याटप्प्याने वाहतूक वळवण्याची योजना लागू करण्यात आली, ज्यावर सतत लक्ष ठेवण्यात आले.

### वक्फ बोर्डाने बळकावलेली एकेक इंच...

महाकुंभ वक्फच्या जागेवर होत असलेल्या दाव्यावर शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी मोठे वक्तव्य केले आहे. जर प्रत्येक मशिदीखाली जर मंदिरे सापडत असतील तर महाकुंभ वक्फच्या जमिनीवर होत असल्याचा दावा जर कोणी करत असेल तर त्यात चुकीचे काय आहे, असा सवाल त्यांनी केला आहे. असा दावा कोणीही करू शकतो. ज्याची जमीन त्याला ती मिळायला हवी, असे शंकराचार्यांनी म्हटले आहे.

### कोकणातील अवैध मासेमारी रोखण्यासाठी...

गस्ती नौके सोबतच राज्याच्या जलधी क्षेत्रात नियंत्रण ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर केल्यास अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांची पुराव्यासह माहिती विभागास उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. अशा नौकांवर सागरी कायद्याअंतर्गत कठोरपणे कारवाई करणे सोईचे होईल. ड्रोनचा वेग जास्त असल्यामुळे एकाच वेळेस अधिकचे क्षेत्र ड्रोनद्वारे देखरेखीखाली येण्यास मदत होणार आहे. ड्रोनचा वापर करुन मासेमारी नौकांची Mapping करुन झाल्यावर अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती विभागास सुलभरित्या उपलब्ध होवू शकेल, ड्रोनद्वारे राज्याच्या किनारपट्टीवरील क्षेत्र देखरेखीखाली येणार असुन उक्त वापरण्यात येणारे ड्रोन हे सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधुन वापरण्यात येणार आहेत, जेणे करुन सागरी सुरक्षा बळकट होण्यास सुध्दा मदत होईल.

अनधिकृत मासेमारीस आळा घालुन शाश्वत मासेमारी टिकुन राहण्याच्या दृष्टीने, राष्ट्रीय सागरी सुरक्षा व सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्याच्या जलधी क्षेत्रात ड्रोनद्वारे देखरेख ठेवून मासेमारीचे नियमन करण्याकरीता ड्रोन आधारित देखरेख आणि डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली भाडेपट्टीने घेण्यात आलेले आहेत.

ड्रोन प्रणालीद्वारे रायगड जिल्ह्याच्या १२२ किमी लांबीच्या समुद्र किनाऱ्यापासून राज्याच्या सागरी हद्दीपर्यंत म्हणजे १२ सागरी मैल अंतरापर्यंत ड्रोनद्वारे महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (सुधारीत २०२१) च्या कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता वापर करण्यात येणार आहे. सदरच्या ड्रोन प्रणालीद्वारे अनाधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांवर नजर ठेवून अशा नौकांची माहिती पुराव्यासह उपलब्ध करून कार्यवाही करण्याकरिता ड्रोन प्रणालीच्या वेबसोलूशन/स्ट्रिमींगचा पुरावा म्हणून वापर करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा व श्रीवर्धन या दोन ठिकाणी सदरची सेवा भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयात ड्रोन आधारित देखरेख आणि डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणालीचा नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) कार्यान्वित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्यातील ०७ सागरी जिल्ह्यातील ०९ ठिकाणी ड्रोन प्रणालीचे उड्डाण व आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयातील नियंत्रण कक्षाचे उदघाटन दि.०९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०.००वा. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री श्री.नितेश राणे यांच्या शुभहस्ते होणार आहे.

याकरिता जिल्ह्यातील सन्माननीय सर्व लोकप्रतिनिधी, मत्स्य सहकारी संस्थांचे, संघांचे प्रतिनिधी, नौका मालक यांनी ड्रोन उडविण्याच्या ठिकाणी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय संजय पाटील यांनी केले आहे.

### पालघर विमानतळ उभारणीसाठी प्रक्रिया...

यावेळी आशियातील सर्वात मोठी फ्लाईंग अकॅडमी एअर इंडिया अमरावतीत सुरु करण्यासंबंधी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर सादरीकरण करण्यात आले.

केंद्र सरकार आणि राज्य सरकारने विमानतळांसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करणे अतिशय गरजेचे आहे. देश ५ ट्रिलियन डॉलर्स इकॉनॉमीकडे वाटचाल करत असताना, सर्वात वेगाने वाढणारे विमान वाहतूक क्षेत्र फार महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र देशाचे ग्रोथ इंजिन म्हणून काम करत आहे. त्यामुळे नागरी विमान क्षेत्राचा वाढता विस्तार विचारात घेऊन पायाभूत सुविधांचा विस्तार करावा लागणार आहे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

यावेळी नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकारी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे कार्यकारी अधिकारी, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचे कार्यकारी अधिकारी उपस्थित होते. तसेच मुख्यमंत्री सचिवालय तसेच विविध विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव उपस्थित होते.

### पीओपी ऐवजी शाडू मातीच्या मूर्ती...

मार्गदर्शक सुचना मध्ये केवळ जैवविघटनशील पर्यावरणास अनुकूल अशा शाडू माती, चिकणमाती वापरून बनवलेल्या कच्च्या मालापासून मूर्ती तयार करणे. अजैविक कच्चा माल, तसेच प्लास्टर ऑफ पॅरीस, प्लॅस्टिक आणि थर्माकोल चा वापर न करणे. मूर्तीचे दागिने बनविण्यासाठी फक्त वाळलेल्या फुलांपासून बनवलेले साहित्य, पेंढा इत्यादींचा वापर करावा आणि मूर्ती आकर्षक बनविण्यासाठी झाडांची नैसर्गिक उत्पादने चमकदार सामग्री म्हणून वापर करावा. मूर्ती रंगविण्यासाठी पर्यावरणास अनुकूल वॉटर कलर्स, जैवविघटनशील आणि बिनविषारी नैसर्गिक रंगाचा वापर करावा. विषारी आणि अविघटनशील रासायनिक रंग, ऑइल पेंट्स, इनॅमल आणि कृत्रिम रंगावर आधारित पेंटस वापरू नयेत याचा यामध्ये समावेश आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# राज्यातील कामगारांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबध्द - कामगार मंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर

## भारतीय मजदूर संघाच्या शिष्टमंडळासोबत कामगार मंत्र्यांच्या आढावा बैठकीत दिले आश्वासन

**कल्याण (विवेक गुंजाळ) :** राज्यातील प्रत्येक कामगाराचा विकास हा केवळ आर्थिक पातळीवर नाही तर सामाजिक, मानसिक आणि शारीरिक पातळीवरही होण्यासाठी शासन कटीबद्ध असल्याचे आश्वासन राज्याचे कामगार मंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर यांनी व्यक्त केले. मंत्रालयात कामगार मंत्री यांनी भारतीय मजदूर संघाच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी भारतीय मजदूर संघाचे क्षेत्रीय संघटन मंत्री सी. व्ही. राजेश, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अ‍ॅड अनिल ढुमणे, प्रदेश महामंत्री किरण मिलगीर, विदर्भ प्रदेश अध्यक्ष रवींद्र गणेशे, महामंत्री गजानन गटलेवार आणि भारतीय मजदूर संघाचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.



कामगार मंत्री फुंडकर यांनी यावेळी सांगितले की, महाराष्ट्र शासनाचे कामगार विषयक धोरण तयार करण्याबाबत चर्चा करण्यात येईल. तसेच कामगारांसाठी प्रत्येक जिल्ह्यात कामगार विमा रुग्णालय स्थापन करण्याबाबत शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येईल. असंघटित कामगारांच्या विकासासाठी निधी उभारण्याचे नियोजन असून या निधीच्या माध्यमातून असंघटित कामगारांसाठी विमा, आरोग्य या योजना राबवण्याच्या शासनाच्या विचाराधीन असल्याचे मंत्री फुंडकर यांनी सांगितले.भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींनी यावेळी आपले निवेदन कामगार मंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर यांना सादर केले असून कामगारांच्या समस्या, त्यांच्या अडचणी, आणि कामगार संघटनांच्या मागण्या, त्यांच्या अंमलबजावणीची स्थिती याबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेत भारतीय मजदुर संघ प्रदेश संघटन मंत्री बाळासाहेब भुजबळ, प्रदेश सचिव विशाल मोहिते, अखिल भारतीय ठेका मजदुर महासंघाचे अखिल भारतीय महामंत्री सचिन मेंगाळे, पुणे जिल्हा सेक्रेटरी सागर पवार, असंघटित क्षेत्र सह प्रभारी श्रीपाद कुटासकर, हर्षल ठोंबरे, कोषाध्यक्ष ‍ॅड बाळकृष्ण कांबळे, घरेलु कामगार संघ प्रदेश अध्यक्ष शर्मिला पाटील, सरचिटणीस संजना वाडकर, प्रदेश सचिव व प्रदेश बांधकाम संघटनेचे अध्यक्ष हरी चव्हाण उपस्थित होते.

# डोंबिवली रेल्वे स्थानकात जाहिरात फलकांमुळे इंडिकेटर दिसत नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी



**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** डोंबिवली रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर रेल्वे प्रशासनाच्या परवानगीने काही जाहिरात एजन्सीने आपल्या जाहिरतीचे फलक लावले आहेत. या जाहिरात फलकांमुळे दूरवरून लोकल धावण्याचे दर्शक (इंडिकेटर) दिसत नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

यापूर्वी डोंबिवली पश्चिमेतून प्रवासी रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर आला की या प्रवाशाला फलाट क्रमांक एक ते पाच क्रमांकावरून कोणत्या लोकल धावत आहेत याची माहिती इंडिकेटरच्या माध्यमातून एका पाहणीत, नजरेत मिळत होती. डोंबिवली पूर्व भागातून स्कायवॉकवर प्रवासी आला की त्याला फलाट क्रमांक पाच ते एकवरून कोणत्या लोकल कोणत्या वेळेत धावत आहेत याची माहिती इंडिकेटरच्या माध्यमातून एका नजरेत मिळत होती. त्याप्रमाणे प्रवासी कोणत्या फलाटावर लोकल पकडण्यासाठी उतरायचे याचा निर्णय घेत होते. गेल्या काही दिवसांपासून डोंबिवली रेल्वे स्थानकातील स्कायवॉकवर रेल्वे प्रशासनाने काही जाहिरात एजन्सींना लहान जाहिरात फलक लावण्यास परवानगी दिली आहे. हे फलक स्कायवॉकवरील छताच्या भागात एका पाठोपाठ लावण्यात आले आहेत. या जाहिरात फलकांमुळे यापूर्वी पूर्व, पश्चिम भागातून स्कायवॉकवर आलेला प्रत्येक प्रवासी दूरवरून दोन्ही बाजुची दर्शक (इंडिकेटर ) पाहू शकत होता. आता प्रवाशांना स्कायवॉकवरील जाहिरात फलकांमुळे दूरवरून दर्शक दिसत नसल्याने प्रवाशांना वेगळ्या बाजुला होऊन, वाकून इंडिकेटर पाहावी लागतात, अशा प्रवाशांच्या तक्रारी आहेत.

महसुली उत्पन्नाचा भाग म्हणून मध्य रेल्वे प्रशासनाने जाहिरात एजन्सींना जरूर रेल्वे स्थानक, स्कायवॉकवर फलक लावण्यास परवानगी द्यावी.

# राष्ट्रीय युवा दिना निमित्त दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) बेलापूर येथे विविध स्पर्धांचे आयोजन

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** महाराष्ट्र राज्याच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्यावतीने, दि १२ जानेवारी २०२५ रोजी स्वामी विवेकानंद जंयती निमित्त दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) बेलापूर जि. ठाणे येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात येणार आहे. अशी माहिती शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,बेलापूर यांनी दिली.

युवकांच्या विविध गुणांना तसेच कौशल्यांना वाव मिळावा व प्रोत्साहन मिळावे यासाठी दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बेलापूर जि. ठाणे येथे दिनांक ०९ ते ११ जानेवारी २०२५ या कालावधीत संस्थेमध्ये कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला व निबंध अशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १० जानेवारी २०२५ रोजी श्री. आदित्य कारखानिस सहाय्यक निर्देशक, श्रम मंत्रालय, मुंबई भारत सरकार यांचे मार्फत अनुसुचित जाती/अनुसुचित जमातीच्या वर्ष १८ वयोगटातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी एक दिवसीय उद्योजकता जागृकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी डॉ. स्नेहल म्हात्रे, तेजज्ञान फाऊंडेशन पुणे, ध्यान ज्ञान केंद्र पनवेल यांचे स्वामी विवेकानंद व त्यांचे विचार यावर मार्गदर्शन होणार आहे. तसेच या स्पर्धांमध्ये विजय प्राप्त केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा गौरव करून त्यांना प्रशस्ती पत्रक देण्यात येणार आहे.या स्पर्धांमध्ये जास्तीत प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घ्यावा,असे आवाहन दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बेलापूर जि. ठाणेचे प्राचार्य स.ज.पाटील एका प्रसिध्द पत्रकाद्वारे केले आहे.

# कल्याणमध्ये ट्रकने आई, मुलाला चिरडले; मनसेसह नागरिकांचे रस्ता रोको

**कल्याण (गणेश बागडे) -** कल्याण येथील पश्चिमेतील लालचौकी भागात बुधवारी सकाळी भरधाव वेगात असलेल्या एका ट्रक चालकाने रस्ता ओलांडत असलेल्या महिला आणि तिच्या मुलाला चिरडले. या दोघांना तात्काळ पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात नेण्यात आले. तत्पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेबद्दल शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



पालिका, रस्ते नियंत्रक एमएमआरडीए आणि वाहतूक पोलिसांच्या निष्क्रियतेचा हा बळी आहे, असा आरोप करत मनसेचे कल्याणचे माजी आमदार प्रकाश भोईर यांनी या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी लालचौकी भागात रस्त्यावर आंदोलन केले. यामध्ये नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.


निशा सोमेसकर (३७) आणि अंश सोमेसकर (३) अशी मृत आई, मुलाचे नाव आहे. शिवाजी चौक ते दुर्गाडी पूल हा सर्वाधिक वर्दळीचा रस्ता आहे. या रस्त्यावरून सर्व प्रकारची वाहने भरधाव वेगात धावत असतात. बुधवारी सकाळी निशा सोमेसकर आपला मुलगा अंश याच्यासह लालचौकी भागातून चालल्या होत्या. लालचौकी येथे रस्ता ओलांडत असताना एक ट्रक दूरवर असताना त्या रस्ता ओलांडून जात होत्या. तेवढ्यात भरधाव वेगात असलेल्या एका ट्रकने निशा आणि अंश यांना गाठले. या दोघांचा ट्रकच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. दोघांना तातडीने पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात नेण्यात आले. तत्पूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता.

### रस्त्यावर आंदोलन

आई, मुलाच्या अपघाताविषयी तीव्र हळहळ व्यक्त करत माजी आमदार प्रकाश भोईर यांनी लालचौकी येथे भर रस्त्यात आंदोलन सुरू केले. हा रस्ता एमएमआरडीएच्या नियंत्रणाखाली आहे. त्यामुळे या रस्त्याकडे कल्याण डोंबिवली पालिका लक्ष देत नाही. या रस्त्याचे दुभाजक वाहने वळण्यासाठी मनमानीप्रमाणे काढले जातात. त्यावर एमएमआरडीए अधिकाऱ्यांचे लक्ष नाही. या वर्दळीच्या रस्त्यावर वाहतूक पोलीस तैनात नसतात. त्यामुळे वाहन चालक मनमानी करत भरधाव वेगाने वाहने चालवतात. त्यात निष्पाप जीव जातात, असे माजी आमदार भोईर यांनी सांगितले.

# दिवा रेल्वे पादचारी पुलावरील गर्दीचा ताण कमी होणार!

## मध्य रेल्वेकडून पुलाच्या रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात



**ठाणे (रोहित जैसवाल) –** दिवा रेल्वे स्थानकातील प्रवाशांसाठी अत्यंत महत्वाचा असलेला मुंबईच्या दिशेकडील पादचारी पुलाच्या रुंदीकरणाचे काम सुरु झाले आहे. या पादचारी पुलाच्या रुंदीकरणासाठी लागणाऱ्या खांब उभारण्याचे काम मध्य रेल्वे प्रशासनाकडून सद्यस्थितीत सुरु आहे. या रुंदीकरणाच्या कामाच्या पुर्णत्वानंतर दिवा स्थानकात सकाळी आणि सायंकाळी पुलावर होणाऱ्या मोठ्या गर्दीतून प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. यासाठी रेल्वे प्रवासी संघटनांकडून सातत्याने मागणी केली जात होती. ठाणे पल्याड रेल्वे स्थानकातील सर्वात महत्वाचे आणि कायम गर्दीने गजबजलेले रेल्वे स्थानक म्हणून दिवा रेल्वे स्थानक ओळखले जाते. येथून दररोज हजारो प्रवासी उपनगरीय लोकल गाड्यांनी ठाणे, मुंबई तसेच कल्याण, डोंबिवलीच्या दिशेने आपल्या नियमित कामासाठी प्रवास करतात. दिवा रेल्वे स्थानकातून कोकणात जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांची संख्या देखील लक्षणीय आहे. यामुळे दिवा स्थानक कायम गर्दीने गजबजलेले असते. मागील काही वर्षांपूर्वी दिवा रेल्वे स्थानकाचा कायापालट प्रकल्प राबविण्यात आला होता.

> ■ दिवा रेल्वे स्थानकातील पादचारी पूल अरुंद असल्याने प्रवाशांना आणि नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. यासाठी सातत्याने मध्य रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. अखेर या पुलाच्या रुंदीकरणाचे काम सुरु झाले असून लवकरच काम पूर्ण झाल्यावर प्रवाशांना आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.
>
> **– आदेश भगत, अध्यक्ष, दिवा रेल्वे प्रवासी संघटना**

# चोरीला गेलेला १ कोटी ४३ लाखांचा मुद्देमाल कल्याण पोलिसांनी केला परत

**कल्याण (गणेश बागडे) :** पोलीस दलाच्या स्थापनेचे औचित्य साधून २ ते ८ जानेवारी दरम्यान ठाणे शहर पोलीस अंतर्गत परिमंडळ-३ कल्याण मधील सर्व पोलिस ठाण्यांमध्ये "पोलीस रेझिंग डे" साजरा करण्यात येत आहे. त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आज कल्याणमध्ये साई नंदन हॉल याठिकाणी "मुद्देमाल माल हस्तांतरण" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण १६२ फिर्यादींचा चोरी झालेला तब्बल १ कोटी ४३ लाखांचा मुद्देमाल कल्याण पोलिसांनी त्यांना परत दिला. यावेळी पोलीस सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण संजय जाधव, पोलिस उपायुक्त अतुल झेंडे, सहायक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्यासह सर्व पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक उपस्थित होते. परत केलेल्या मुद्देमालात



३८ किमंती मुद्देमाल, ३० वाहने, ९१ मोबाईल, ६४ लाख ९५ हजार ८१० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, ४९ लाख ७१ हजार किमतीचे वाहने, १५ लाख ९३ हजार किमतीचे मोबाईल, १२ लाख ७८ हजार रोख रक्कम असा एकूण १ कोटी ४३ लाख ३७ हजार ८१० किमतीचा मुद्देमाल नागरिकांना परत करण्यात आला आहे. आपल्या हरवलेल्या वस्तू, पैसे आदी मुद्देमाल परत मिळाल्याचा मोठा आनंद या व्यक्तींच्या चेहऱ्यावर दिसत होता.

# बैठ्या घरांच्या पुनर्बांधणीचा मार्ग मोकळा; पार्किंगची अट शिथिल करण्याचा महापालिकेचा निर्णय

**नवी मुंबई (भावना जैन) :** नवी मुंबईची उभारणी करत असताना सिडकोने अल्प उत्पन्न गटातील रहिवासी, माथाडी कामगार तसेच आर्टिस्ट व्हिलेजसारख्या वसाहतींमध्ये उभारलेल्या बैठ्या घरांच्या पुनर्बांधणीत मोठा अडथळा ठरत असलेली पार्किंगची अट काढून टाकण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय नवी मुंबई महापालिका प्रशासनाने घेतला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिका प्रशासनाने १ जानेवारी रोजी शहरातील पार्किंग आवश्यकतेसंबंधीची एक नियमावली जाहीर केली असून यामध्ये लहान बैठ्या घरांना ही सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शहरातील ४० हजारांपेक्षा अधिक बैठ्या घरांच्या पुनर्बांधणीचा मार्ग मोकळा होणार आहे.

नवी मुंबईत नव्याने उभ्या राहणाऱ्या इमारतींमधील वाहनतळाच्या मुद्द्यावरून वाशी येथील सामाजिक कार्यकर्ते संदीप ठाकूर यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाच्या तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती डॉ. मजुला चेल्लूर आणि न्यायमूर्ती एस. एस. सोनक यांनी या याचिकेवर २०१६ मध्ये निर्णय देताना ३५० (कार्पेट) ते ४५० चौरस फुटांच्या घरांची बांधणी करताना किमान एक वाहन उभे करण्याची व्यवस्था असावी असे बंधनकारक केले. शहरात मुबलक पार्किंग व्यवस्था उभी राहावी यासाठी हा निर्णय ऐतिहासिक ठरला तरी सिडकोने वेगवेगळ्या उपनगरांत उभारलेल्या बैठ्या घरांच्या पुनर्बांधणीस तो मारक ठरत असल्याचे पुढे स्पष्ट झाले.



सिडकोने शहराची निर्मिती करत असताना उभारलेल्या बैठ्या घरांच्या वसाहतींमध्ये वाहनतळांसाठी पुरेशी जागा नाही. जेमतेम दीड ते दोन मीटर रुंदीच्या पायवाटेवर घराचे प्रवेशद्वार असलेल्या या घरांची पुनर्बांधणी करत असताना पार्किंगसाठी जागा सोडणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही. सिडकोने कलाजनांसाठी सीबीडी सेक्टर आठ येथे उभारलेल्या आर्टिस्ट व्हिलेज या बैठ्या घरांच्या वसाहतींमध्येही हा प्रश्न आहे. पार्किंगची व्यवस्था होत नसल्यामुळे महापालिकेने २०१६ पासून बैठ्या घरांच्या पुनर्बांधणीस परवानगी देणे बंद केले होते.

यासंबंधीच्या याचिकेवर उच्च न्यायालयाने मध्यंतरी दिलेल्या आदेशानुसार महापालिकेने शहरातील पार्किंग व्यवस्थेसंबंधी निकष ठरविण्यासाठी कोकण विभागाच्या नगररचना विभागाचे तत्कालीन सहसंचालक जितेंद्र भोपळे यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ नियोजन अधिकाऱ्यांच्या एका समितीची नेमणूक केली होती. या समितीच्या माध्यमातून नागरिकांकडून पार्किंग व्यवस्थेसंबंधी सूचना मागविण्यात आल्या होत्या. हजारोंच्या संख्येने सूचना महापालिकेस प्राप्त झाल्या होत्या. भोपळे यांच्या समितीने महापालिकेस पार्किंग व्यवस्थेसंबंधीचा एक अहवाल नुकताच सादर केला होता. या अहवालातील शिफारशीनुसार महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी १ जानेवारी रोजी यासंबंधीची नियमावली प्रसिद्ध करताना लहान भूखंडावर उभ्या करण्यात आलेल्या सिडकोच्या बैठ्या घरांना पार्किंग बंधनातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या नियमावलीसंबंधी सविस्तर हरकती सूचना मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून सुनावणीनंतर शासन मंजुरीनंतर त्यावर शिक्कामोर्तब केले जाणार आहे. पालिकेचा हा निर्णय ऐतिहासिक म्हणायला हवा. शहरातील बैठ्या घरांच्या पुनर्बांधणीला परवानगी मिळायला हवी आणि त्यासाठी पार्किंगची शक्य नसलेली अट शिथिल करायला हवी यासाठी रहिवासी संघटना गेली सात वर्षे सातत्याने लढा देत आहेत.

> ■ शहरात सिडकोने बांधलेल्या लहान बैठ्या घरांमधील रहिवाशांना पुनर्बांधणीचा अधिकार मिळायला हवा आणि सध्याची परिस्थिती लक्षात घेता आम्ही नियमांमध्ये योग्य ते बदल केले आहेत.
>
> **– डॉ. कैलास शिंदे, आयुक्त नवी मुंबई महापालिका**

### महापालिकेचेही नुकसान

नवी मुंबईतील जवळपास सर्वच उपनगरांमध्ये सिडकोने ए, बी, एसएस, बी-२ अशा इंग्रजी आद्याक्षरांनी सुरू होणाऱ्या बैठ्या घरांची उभारणी केली आहे. या वसाहतींमधील घरांपर्यंत पोहोचण्यासाठी सिडकोने जेमतेम दीड ते दोन मीटर रुंदीच्या मार्गिका काढून दिल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी जुन्या अथवा नव्या प्रोत्साहन विकास नियमावलीनुसार पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देणे रहिवाशांना शक्यच होत नाही. पार्किंगची सुविधा उपलब्ध केली तरीही लहानशा पायवाटेतून घरापर्यंत चारचाकी वाहन जाणार तरी कसे, असा सवाल रहिवासी उपस्थित करत आहेत. यापूर्वी सिडकोकडे लीड प्रीमियम आणि महापालिकेकडे बांधकाम परवानगीसाठी आवश्यक शुल्क भरून बैठ्या घरांमधील रहिवासी आपल्या घरांचा पुनर्विकास करत. गेल्या सात ते आठ वर्षांपासून या घरांच्या पुनर्बांधणीसाठी महापालिकेकडे शेकडोंच्या संख्येने अर्ज आले आहेत. मात्र पार्किंग व्यवस्था काढणे शक्य नसल्याने महापालिका या घरांच्या पुनर्बांधणी प्रस्तावांना परवानगी देत नाही. यामुळे महापालिका तसेच सिडकोचेही आर्थिक नुकसान होत होते. शिवाय महापालिकेच्या परवानगीशिवाय बैठ्या घरांची पुनर्बांधणी मात्र बेकायदा पद्धतीने सुरूच होती.

# जान्हवी किल्लेकर पोहोचली नलिनी काकूंच्या घरी !

# चुलीवर बनवलं स्पेशल 'बनाना लीफ पापलेट'

बिग बॉस मराठी'च्या पाचव्या सीझनमुळे अभिनेत्री जान्हवी किल्लेकर घराघरांत चर्चेत आली. हा शो संपल्यावरही या 'किल्लर गर्ल'ची लोकप्रियता जराही कमी झालेली नाही. नुकतीच तिची 'स्टार प्रवाह'च्या 'अबोली' मालिकेत एन्ट्री झाली आहे. याशिवाय गेल्या काही महिन्यांमध्ये जान्हवीने सूरज चव्हाणच्या मोढवे गावी तसेच घन:श्यामच्या वाढदिवसाला सुद्धा उपस्थिती लावली होती. आता ही अभिनेत्री सुप्रसिद्ध इन्फ्लुएन्सर नलिनी काकूंच्या घरी पोहोचली आहे.

नलिनी मुंबईकर यांना घराघरांत 'नलिनी काकू' म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या हातचे मच्छीचे पदार्थ, त्यांचे मसाले, नलिनी काकूंची जेवण बनवण्याची पद्धत या सगळ्या गोष्टींची सोशल मीडियावर कायम चर्चा असते. त्यांचं जेवण पाहून सर्वांच्या तोंडाला पाणी सुटतं. तशा कमेंट्स सुद्धा नलिनी काकूंच्या व्हिडीओवर असतात. नुकतंच त्यांनी अलिबागला स्वत:चं हॉटेल देखील सुरू केलेलं आहे. जान्हवी किल्लेकरने अलीकडेच या हॉटेलला भेट दिली.

### जान्हवी पोहोचली नलिनी काकूंच्या घरी



जान्हवी काकूंना भेटण्यासाठी अलिबागला गेली होतीय अभिनेत्रीने नलिनी काकूंच्या किचनमध्ये एन्ट्री घेऊन, "आज माझ्यासाठी स्पेशल काय बनवताय" असा प्रश्न त्यांना विचारला. यावर काकू म्हणाल्या, "तुझ्यासाठी मी आज खास 'Banana Leaf पापलेट' बनवणार आहे." यानंतर या दोघी मिळून स्वयंपाक घरात चुलीवर पापलेट बनवत असल्याचं व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. याची संपूर्ण रेसिपी त्यांनी या व्हिडीओमध्ये दाखवली आहे. पापलेट बनवताना जान्हवीने काकूंना मदत केली. 'Banana Leaf पापलेट' तयार झाल्यावर जान्हवीने याचा नलिनी काकूंसमोरच आस्वाद घेतला. यावेळी 'खूपच सुंदर झालंय' अशी प्रतिक्रिया देत अभिनेत्रीने नलिनी काकूंचं कौतुक केलं. या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी प्रतिक्रियांचा पाऊस पाडला आहे. दरम्यान, जान्हवी किल्लेकर आणि नलिनी काकू या दोघींना एकत्र पाहून नेटकऱ्यांनी व्हिडीओवर, "खूपच सुंदर", "आता जान्हवी हळुहळू फेव्हरेट होत चाललीये", "तोंडाला पाणी सुटले काकू", "अरे वाह जान्हवी ताई तिकडे पोहोचली", "दोघींना एक पाहून छान वाटलं" अशा कमेंट्स केल्या आहेत. सध्या हा व्हिडीओ सर्वत्र व्हायरल होत आहे.

## लग्नाआधी अंकिता वालावलकर भेटली योगिता चव्हाणला

'बिग बॉस मराठी'चं पाचवं पर्व चांगलंच गाजलं. त्यामुळे या पर्वातील सर्व सदस्य नेहमी चर्चेत असतात. लवकरच 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वात झळकलेली अंकिता वालावलकर लग्नबंधनात अडकणार आहे. संगीतकार कुणाल भगतबरोबर अंकिताच लग्न होणार आहे. त्यामुळे सध्या दोघं लग्नाची जोरदार तयारी करताना दिसत आहेत. लग्नाआधी अंकिता-कुणालने योगिता चव्हाण आणि तिच्या नवऱ्याची भेट घेतली. याचा फोटो सध्या व्हायरल झाला आहे.



अंकिता वालावलकरने योगिता चव्हाणबरोबरच्या भेटीचा फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. या फोटोमध्ये अंकिता, कुणाल, योगिता आणि सौरभ चौघुले पाहायला मिळत आहेत. हा फोटो शेअर करत अंकिताने लिहिलं आहे की, दोन अधिक विचार करणारे आणि दोन उत्तम संवाद साधणारे एकाच फ्रेममध्ये...ओळखा पाहू कोण?

अंकिताची ही पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. या पोस्टवरील 'डीपी दादा' म्हणजे धनंजय पोवारच्या प्रतिक्रियेने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. धनंजयने मजेशीर प्रतिक्रिया दिली आहे. त्याने अंकिता, कुणाल, योगिता आणि सौरभला टॅग करून लिहिलं की, पचणार नाही दोघी बहिणी आणि दोन्ही जावयांना. धनंजयच्या या प्रतिक्रियेवर अंकिता म्हणाली, "तुम्ही आधी कोणाच्या बाजूने आहात? नक्की ते सांगा." यावर 'डीपी' म्हणाला, "तुझ्या नेहमी." त्यानंतर योगिता म्हणाली की, आम्ही मटण बिर्याणी खाल्ली बरं का? मग सौरभ म्हणाला, "आधी तुम्ही भेटा ओ...नियोजन करा." तसंच अंकिताच्या कॅप्शननुसार अभिनेत्री हेमांगी कवीने प्रतिक्रिया दिली आहे. ती म्हणाली, "तू आणि योगिता अधिक विचार करणारे, सौरभ आणि कुणाल उत्तम संवाद साधणारे." दरम्यान, काही दिवसांपूर्वी अंकिताने लग्नाची पत्रिका सोशल मीडियावर शेअर केली होती. पण, अद्याप अंकिताने लग्नाची तारीख तिने जाहीर केलेली नाही.

## जिलबी ट्रेलर लाँचला प्रसादने स्वप्नील बद्दल सांगितल्या खास गोष्टी !

जिलबी सिनेमाचा ट्रेलर लाँच सोहळा संपन्न झाला आणि या ट्रेलर लाँच वेळी प्रसाद ओक स्वप्नीलच तोंड भरून कौतुक तर केलं पण सोबतीला या दोघांनी एकमेकांबद्दल खास गोष्टी देखील सांगितल्या. जिलबीच्या निमित्ताने स्वप्नील आणि प्रसाद पहिल्यांदा एकत्र काम करताना दिसणार आहेत. दिग्दर्शक अभिनेता प्रसाद ओक स्वप्नील बद्दल बोलताना म्हणाला " आम्हाला जिलबीच्या निमित्ताने दोघांना स्क्रीन स्पेस शेयर करता आली. आम्ही पहिल्यांदा एकत्र काम करतोय आणि जिलबी च्या सोबतीने आमच्या अनेक कामाची एकत्र सुरुवात झाली. जिलबी होत असताना आमचं ठरलं की आपण सुशीला सुजीत करतोय म्हणून आमच्यासाठी जिलबी अगदीच खास आहे. स्वप्नील कमालीचा अभिनेता आहे आणि त्याचा सोबत काम करताना देखील तितकीच



मज्जा आली. मी सेटवर स्वप्नीलला कायम निरखून बघायचो त्याची काम करण्याची पद्धत काम करण्याचा उत्साह हा सेटवर एक खेळीमेळीच वातावरण निर्माण करणार असायचं. स्वप्नील एक अभिनेता म्हणून उत्तम आहे पण निर्मिती विश्वात तो काहीतरी वेगळं करू पाहतोय आणि येणाऱ्या काळात देखील स्वप्नील उत्तम प्रोजेक्ट्स करेन अशी मला खात्री आहे"

## रेश्मानंतर 'रंग माझा वेगळा' मालिकेच्या टीमने शिवानी-अंबरचं थाटामाटात केलं केळवण!




'रंग माझा वेगळा' या मालिकेने जवळपास ४ वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं. या मालिकेने सर्वांचा निरोप घेतला असला तरीही, यामध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारणारे सगळे कलाकार आजही एकमेकांच्या तेवढेच संपर्कात असतात. काही दिवसांपूर्वीच या सगळ्या कलाकारांनी मिळून अभिनेत्री रेश्मा शिंदेचं केळवण केलं होतं.आता रेश्मानंतर 'रंग माझा वेगळा'च्या टीमने अंबर गणपुळेच्या केळवणासाठी जय्यत तयारी केल्याचं पाहायला मिळत आहे. मालिकेच्या टीमने या अंबर-शिवानी जोडप्याचं केळवण एका हॉटेलमध्ये केलं. यासाठी संपूर्ण फुलांची सजावट करण्यात आली होती. याशिवाय केळीच्या पानावर 'शिवानी-अंबरचं केळवण' असं लिहिण्यात आलं होतं.शिवानी आणि अंबरचा साखरपुडा गेल्यावर्षी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पार पडला होता. यानंतर ही जोडी विवाहबंधनात केव्हा अडकणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. केळवण पार पडल्यावर आता दोघांच्या घरी लग्नाआधीच्या विधींना सुरुवात होऊन लवकरच ही जोडी विवाहबंधनात अडकणार आहे.'रंग माझा वेगळा' मालिकेच्या टीमने अंबर-शिवानीच्या केळवणात धमाल केल्याचं पाहायला मिळत आहे. याचे अनेक Inside व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. शिवानी व अंबर यांच्या केळवणाला, रेश्मा शिंदे, विदिषा म्हसकर, शाल्मली टोळ्ये, आशुतोष गोखले, हर्षदा खानविलकर, तनिषा विषे, पूर्णिमा तळवलकर असे मालिकेतील सगळे कलाकार उपस्थित होते.याशिवाय 'घरोघरी मातीच्या चुली' फेम अभिनेता सुमीत पुसावळे व त्याची पत्नी मोनिका यांनी देखील अंबर-शिवानीचं केळवण केल्याचे फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केले आहेत. तसेच यांच्या लग्नसोहळयात दोघांच्या नावाची फोड करुन 'Ambani' हा खास हॅशटॅग वापरण्यात येत आहे.शिवानी सोनार व 'रंग माझा वेगळा' फेम अंबर गणपुळेचं केळवण दरम्यान, अंबर-शिवानीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर अंबरने आतापर्यंत 'रंग माझा वेगळा' 'कलर्स मराठी'ची मालिका 'दुर्वा' यामध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. तर, शिवानी 'राजा राणीची गं जोडी' आणि 'तू भेटशी नव्याने' अशा मालिकांमध्ये झळकली आहे.

## श्रीदेवींचे पती बोनी कपूर यांचा लेकींबरोबरचा मजेशीर अंदाज पाहिलात का?

आमिर खानचा मुलगा जुनैद खान आणि बोनी कपूर-श्रीदेवी यांची मुलगी खुशी कपूर लवकरच 'लव्हयाप्पा' या चित्रपटात एकत्र झळकणार आहेत. या चित्रपटाच्या भव्य प्रदर्शनाआधी, दोन्ही स्टार किड्स आपापल्या अनोख्या पद्धतीने त्याचा प्रचार करत आहेत. यामध्ये खुशीने तिची बहिण जान्हवी कपूर आणि वडील बोनी कपूर यांच्याबरोबर मजेशीर रील तयार करत चित्रपटाचे प्रमोशन केले आहे. 'लव्हयाप्पा हो गया' असे या गाण्याचे नाव आहे. खुशीने तिच्या इन्स्टाग्रामवर एक मजेशीर रील शेअर केली, ज्यामध्ये ती आणि जान्हवी या गाण्याचे हुक स्टेप्स करताना दिसत आहेत. परंतु या व्हिडीओची खरी शोभा त्यांच्या वडिलांनी, बोनी कपूर यांनी वाढवली. त्यांनी रीलमध्ये अप्रत्यक्षरीत्या फोटोबॉम्ब करत गाण्याचा 'अलाप' भाग सादर केला, ज्यामुळे चाहत्यांची मने जिंकली. हा रील प्रचंड चर्चेत



आला असून चाहत्यांसह अनेक सेलिब्रिटींनीही यावर प्रतिक्रिया दिल्या. जान्हवी आणि खुशीचा सावत्र भाऊ अर्जुन कपूरने त्यांच्या वडिलांच्या मजेशीर कॅमिओचे कौतुक करत लिहिले, "बेस्ट अलाप एव्हर!!!" अभिनेता वरुण धवनने हसण्याचा इमोजी पोस्ट केला. चाहत्यांनीही "बोनीजी इज द मैन कॅरेक्टर!" अशा कमेंट्स करत आपलं प्रेम व्यक्त केलं. दरम्यान, जुनैद खानने याआधी 'महाराज' या यशराज फिल्म्सच्या चित्रपटातून पत्रकाराच्या गंभीर भूमिकेत पदार्पण केले होते. मात्र, 'लव्हयाप्पा हो गया' या गाण्यात तो एकदम वेगळ्या अवतारात दिसत आहे. रंगीत पोशाख परिधान करून, जुनैद आणि खुशी हे गाण्यात तरुण प्रेमींच्या दृश्यांत दिसतात. या गाण्याचे मजेशीर आणि रिलेटेबल शब्दसुद्धा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहेत.'लव्हयाप्पा' चित्रपट ७ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच आमिर खानने ANI शी बोलताना 'लव्हयाप्पा'बद्दल आपली प्रतिक्रिया दिली. त्याने चित्रपटाला 'मनोरंजक' असे म्हटले. आमिर म्हणाला, "मला हा चित्रपट आवडला, तो खूप मनोरंजक आहे.

## लग्नानंतरची पहिली मकरसंक्रांत साजरी करण्यासाठी पूजा सावंत लागली तयारीला



मराठी सिनेसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री पूजा सावंत नेहमी चर्चेत असते. तिचे नवनवीन फोटो, व्हिडीओ सातत्याने व्हायरल होतं असतात. काही दिवसांपूर्वी पूजा सावंतच्या ऑस्ट्रेलियातील घराचा व्हिडीओ तुफान व्हायरल झाला होता. या व्हिडीओमध्ये पूजा आपल्या आई-वडिलांना पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियातलं प्रशस्त घर दाखवताना दिसली होती. त्यानंतर आता पूजा लग्नानंतरच्या पहिल्या मकरसंक्रांतीच्या तयारीला लागली आहे. यासंदर्भात तिने नुकताच सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर केला आहे.



गेल्यावर्षी २८ फेब्रुवारीला पूजा सावंतने लग्नगाठ बांधली. ती सिद्धेश चव्हाणशी लग्नबंधनात अडकली. त्यामुळे सध्या पूजा वैवाहिक आयुष्य एन्जॉय करत आहे. पूजाचा नवरा सिद्धेश हा ऑस्ट्रेलियातील एक फायनान्स कंपनीत कामाला आहे. त्यामुळे अभिनेत्री कधी ऑस्ट्रेलियात तर कधी मुंबईत असते.

आता पूजा मकरसंक्रांतीच्या तयारीला लागली आहे. लग्नानंतरची पूजाची ही पहिलीच मकरसंक्रांत आहे.पूजा सावंतने इन्स्टाग्राम स्टोरीवर व्हिडीओ शेअर करून मकरसंक्रांतीच्या तयारीला लागल्याचं सांगितलं आहे. तिने हलव्याच्या दागिन्यांचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओवर तिने लिहिलं आहे की, वेध...पहिल्या मकरसंक्रांतीचे. या व्हिडीओनंतर तिने हलव्याच्या मंगळसूत्राचा फोटो शेअर केला आहे.

## राशी भविष्य




**मेष** – कष्टाचे परिणाम दिसून येतील. मानसिक शांती, आरोग्याच्या दृष्टीने दिवस चांगला आहे. विविध आव्हाने येतील.

**वृषभ** – व्यावसायिक संबंध, स्नेहसंबंध सुधारतील. मानसिक अस्वस्थता दूर होईल. आरोग्याबाबत काळजी घ्यावी.

**मिथुन** – तुमच्या विचारांचा व संवादाचा प्रभाव पडेल. एकाग्रतेची आवश्यकता आहे, अन्यथा कामात गडबड होऊ शकते.

**कर्क** – कुटुंबात सकारात्मक बदल होऊ शकतात. वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात संतुलन साधावे लागेल.

**सिंह** – प्रेम आणि वैवाहिक जीवनात समर्पण आवश्यक आहे. तुम्ही हिंमत आणि आत्मविश्वासाने पुढे जात राहाल.

**कन्या** – कुटुंबासोबत वेळ घालवाल. आरोग्याबाबत हलक्या ताणामुळे त्रास संभवतो. दृष्टिकोन सुधारण्याची गरज आहे.

**तुळ** – व्यवसायात नवीन संधी मिळतील. प्रेम व मित्रात समजूतदारपणा दाखवाल. ताण निवारणासाठी शांतता राखा.

**वृश्चिक** – तुमच्या मेहनतीला फळ मिळेल. आर्थिक बाबतीत फायदा होण्याची शक्यता आहे. प्रलंबित प्रश्न सुटतील.

**धनु** – तुमच्या विचारांची दिशा बदलू शकते, पण त्यासाठी अधिक मेहनत लागेल. प्रेम आणि मैत्रीचे नाते मजबूत होईल.

**मकर** – आर्थिक बाबतीत अडचणी येतील, पण त्यावर मात केली जाऊ शकते. आरोग्याबाबत चांगले संकेत आहेत.

**कुंभ** – जीवनशैलीत बदल करू शकाल. तुमचे काम व वैयक्तिक जीवन संतुलित ठेवा. कुटुंबासाठी चांगले निर्णय घ्याल.

**मीन** – तुमच्यातील सृजनशीलता पुढे येईल. नवीन मार्ग शोधू शकता. शारीरिक दृष्टीने उत्तम काळ अनुभवता येईल.

# अंकलेश्वरमध्ये विचित्र अपघात, कारचा चक्काचूर, पालघरमधील ३ जणांचा मृत्यू

**पालघर (सुचिता सोनावणे) :** राजस्थानमधील अजमेर शरीफ दर्गा येथे दर्शनासाठी गेलेल्या पालघर मधील भाविकांचा गुजरातमधील अंकलेश्वर येथे भीषण अपघात झालाय. पहाटे साडेतीन वाजता काळाने घाला घातला. भरधाव कारने टँकरला जोरदार धडक दिल्यामुळे हा भीषण अपघात घाताल. पालघरच्या मनोर येथील आयान बाबा चौगले , ताहीर नासिर शेख आणि टाकवहाल येथील मुद्दत्सर अन्सार पटेल यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामध्ये चार जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर भरूच येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



अपघात इतका भीषण होता की भरधाव कारचा चक्काचूर झालाय.

राजस्थान राज्यातील अजमेर शरीफ दर्गा वरून परतीच्या प्रवासा दरम्यान गुजरात राज्यातील भरूच अंकलेश्वर भागात बुधवारी (ता.०८)पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात पालघर तालुक्यातील तीन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आयान बाबा चोगले (रा. मनोर) ताहीर नासिर शेख (रा. पालघर) आणि मुदस्सर अन्सार पटेल (रा. टाकवहाल) यांचा मृत्यू झाला. तर सलमान अल्ताफ शेख, शाहरुख सलीम शेख, शादाब मलिक शेख आणि मोईन सलीम शेख सर्व (रा. काटाळे) गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर गुजरातमधील भरूच परिसरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

गुजरातमधील अंकलेश्वर येथे पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास मागून भरधाव येणाऱ्या ट्रकने कारला धढक दिली. त्यामुळे कार चालकाचे नियंत्रण सुटले अन् समोर असणाऱ्या ट्रकला जोरदार धडक बसली अन् भीषण अपघात झाला होता. अपघातग्रस्त आर्टीगा कारचा चक्काचूर झाला आहे. अपघाताची माहिती कळताच मनोर, टाकवाहाल, काटेला आणि पालघर शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

पालघरमधील सात जण अजमेर येथील उर्स उत्सवात सहभागी होऊन परतत होते. सुरतच्या दिशेने येत असताना त्यांच्या कारचा अपघात झाला. अंकलेश्वर पानोलीजवळील पुलावर मागून येणाऱ्या ट्रकने कारला धडक दिली. धडकेमुळे कार पुढे हळू चालणाऱ्या दुसऱ्या ट्रकला धडकली. कारमध्ये प्रवास करणाऱ्या तिघांचा जागीच मृत्यू झाला. या अपघतात जखमी झालेल्या चार जणांवर जवळच्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत, असे पोलीस अधिकारी शिल्पा देसाई यांनी सांगितले.

# पागोटे ते चौक मार्गामुळे मुंबई पुणे अतिजलद प्रवास

## २० ते २५ किलोमीटरचे अंतर कमी होण्यास मदत

**उरण (भावना जैन) :** मुंबई पुणे द्रुतगती मार्गाला जोडणाऱ्या प्रस्तावित उरणमधील जेएनपीए बंदरातील पागोटे ते चौक या ३० किलोमीटर लांबीच्या मार्गामुळे मुंबई पुणे मार्गातील जवळपास २० किलोमीटरचे अंतर कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे मुंबई ते पुणे हा प्रवास अतिजलद गतीने होणार आहे.

३ हजार ३३६ कोटी रुपये खर्चाचा हा मार्ग जेएनपीए ते पळस्पे या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४८ ला जोडला जाणार आहे. जेएनपीए बंदरातील वाढत्या कंटेनर हाताळणीमुळे वाहन संख्येतही वाढ होणार आहे. त्यामुळे जेएनपीए मार्गावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असल्याने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून हा मार्ग उभारला जाणार आहे.

इकॉनॉमिक कॉरिडॉर म्हणून संबोधण्यात येणारा हा मार्ग जेएनपीए बंदर खोपटे,एमएसआरडीसी, नैना आणि एनएमडीपी असा असणार आहे. भारत माला प्रायोजनेतून या मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे उरणचे आमदार महेश बालदी यांनी याची मागणी केली होती. त्यानंतर १९ जूनला या मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. हा मार्ग उरण, पनवेल, खलापूर आणि कर्जत या रायगड जिल्ह्यातील चार तालुक्यातून जाणार आहे. त्यामुळे या परिसरातील अनेक गावे ही मुंबई पुण्याशी थेट जोडली जाणार आहेत.



SPORT

## Sam Konstas Reveals Chat With 'Legend' Kohli After Boxing Day Drama: 'Told Virat I Idolise Him, He Said....'




**NEW DELHI :** The Border-Gavaskar Trophy was a series to remember for Sam Konstas. The 19-year-old made his debut in the fourth Test at Melbourne Cricket Ground and hammered a T20-style fifty, leaving the Indians rattled. He scooped and ramped Jasprit Bumrah during the stunning knock as the cricket world stood in awe.

youngster did not change his approach to take the Indians head-on in the final Test in Sydney and exchanged words with Jasprit Bumrah during the final over of Day 1. The altercation triggered Jasprit Bumrah who removed Usman Khawaja in the same over and gave a death stare to Konstas as the Indians charged towards him. Days after Australia's emphatic win in the Border-Gavaskar Trophy, Konstas reflected on his heated exchanges with Virat Kohli and Jasprit Bumrah and accepted that emotions got the better of him.“I loved every second of it but there's great learnings to be had and reflect on and hopefully in future tours I can learn from that,” Konstas said on CODE Sports. Konstas also revealed his chat with Virat Kohli after the fiery exchange with the Indian superstar. The batter revealed he told Kohli that he idolise him and got a humble reply in return“I had a little chat after the game telling him that I idolise him, and it's obviously a huge honour playing against him,” Konstas said. “When I did verse him, I was like, 'wow, Virat Kohli is batting.' He just had that presence about him, all the Indian crowd getting amongst it. Chanting his name. It was quite surreal.“He was very down to earth. A lovely person and just wishing me all the best saying hopefully I go well on the tour of Sri Lanka he said if I'm in. My whole family loves Virat. I've idolised him from a young age and he's a legend of the game,” he added.

## 'Don't see Bumrah as captain. Kohli's next': Rohit Sharma speculated to retire after Champions Trophy; Gill backed as...

**NEW DELHI :** India's chief selector, Ajit Agarkar, is expected to incur a “challenging period” ahead as former Australia cricketer Adam Gilchrist speculated that incumbent captain Rohit Sharma will retire after the end of the Champions Trophy in March. He further expects one between Jasprit Bumrah or Virat Kohli to lead the Test team during India's next assignment in June, while Michael Vaughan backed Shubman Gill to serve as the deputy.

One of the biggest talking points emerging from India's disastrous tour of Australia, where the team lost 1-3 to concede the Border-Gavaskar Trophy for the first time in eight years, has been the future of Rohit and whether he will remain the skipper even if he gets picked for the tour of England, which will mark the beginning of the new World Test Championship cycle.

Speaking on Club Prairie Fire, Gilchrist said that he does not




see Rohit in the Indian team for the Test series in England and expects the 37-year-old to end his career after the ICC Champions Trophy, which will begin on February 19.

"I don't see Rohit going to England. I just felt that he says he will assess it when he gets home. I mean, the first thing he will be meet with when he gets home is a two-month-old baby that he has to change the nappies on. Now that might incentivise him to go to England. But I know I don't; I don't see him pressing on. I think he'll probably have a crack at the Champions Trophy and that might be. That might see him out," he said.

The Aussie legend then picked Bumrah as a solution to replace Rohit as the next India captain in Test cricket but reckoned it might be challenging for the pacer, given the workload concerns. He admitted that he won't be surprised if the Indian selectors go back to Kohli, who did lead the Indian team in Bumrah's stead on Days 2 and 3 in the Sydney Test for the England series."I don't know whether Bumrah should be full-time captain. I reckon that might get a little bit challenging for him. So, who that next captain may be is anyone's guess, really, whether they go back to Virat. I wouldn't be surprised if he wouldn't mind doing it. But yeah, I haven't stopped to really think who will be captain. "It's a challenging period coming up for India. They've got ready-made replacements. I mean, the IPLs have produced a number of talented players that are lined up across every position, 1 to 11 really, that they could draw on. But it doesn't mean that it's instant success at the international level. So I think they could be in for a challenging little period," he added.

Vaughan, who was also on the panel, backed Gilchrist's notion to name Bumrah the next captain based on India's performance under the fast bowler in Perth, which was India's only win in the last eight Test matches.

"I think you're right. I would give the captain seat to Jasper Bumrah, and the reason is the two performances that India were at their finest here in Australia were Perth and the SCG. And if he had not been injured, I honestly think they would have won that game," he said.

The former England captain also backed Gill as the vice-captain, but reckoned the youngster needed to improve his numbers after a poor tour of Australia.




## Jasprit Bumrah OUT, No Yashasvi Jaiswal: Predicted Strongest India Playing XI For ODI Series Vs England

**NEW DELHI :** India are coming off fresh from the 1-3 defeat against Australia in the Border-Gavaskar Trophy, which means that they missed their chance of qualifying for the WTC 2025 final. In just a few months, India will have another chance to win an ICC trophy when tey take part in the Champions Trophy 2025. The final ODI series that they will play in preparation for the upcoming tournament will be the three-match affair against England at home from February 9. Hence, they might look for a playing XI that looks exactly like that of the mega tournament. However, they might miss the services of Jasprit Bumrah.

Rohit Sharma will likely open the batting with Shubman Gill. There have been reports of Yashasvi Jaiswal being in the squad, but he will most likely not make it to the final playing XI. Virat Kohli will look to find his form at no.3, with shreyas Iyer returning to India colours fresh off the back of a fantastic domestic season, at no4. KL Rahil will be batting at no.5 and will be the wicketkeeper-batter ahead of Rishabh Pant.

Hardik Pandya will return to the India playing XI for the first time since the T20I series vs South Africa. Ravindra Jadeja and Axar Patel will likely be the two spin-bowling all-rounders who will come in at no.7 and 8.

Jasprit Bumrah is all set to miss the ODI series vs England as he will be rested after suffering from back spasm in the final Test vs Australia at Sydney. Mohammed Shami is all set to make his comeback for India for the first time since the ODI World Cup 2023, and will lead the pace attack. He will be supported by Arshdeep Singh who will add variety with his left-arm pace. Kuldeep Yadav will be the specialist spinner in the lineup.

# India Champions Trophy squad announcement: Bumrah races against time; selectors to reveal team squad by January 12

**NEW DELHI :** India Champions Trophy squad announcement Live: Rohit, Shubman Gill and Yashasvi Jaiswal are among the contenders for the role, with the latter expected to be the back-up. The youngster has proven himself to be India's most promising long-format batters, but is yet to earn the ODI cap, having last played a List A game in November 2022. Overall, he has scored 1511 runs in 32 innings at 453.96, with five tons and seven fifties.

India Champions Trophy squad announcement Live: Bumrah, who suffered back spasms during the Sydney Test, races against time to get fit for the Champions Trophy. BCCI's medical team has yet to give an official update on the grade of Bumrah's injury.

If Bumrah's injury is in grade 1 category, then it will take a minimum two to three weeks of rehabilitation before Return to Play (RTP). In case of Grade 2 injury, the recovery can go up to six weeks while Grade 3, the most severe in nature, requires a minimum three months of rest and rehabilitation programmes.

India Champions Trophy squad



announcement Live: Hardik Pandya was India's vice-captain during the 2023 ODI World Cup, until his injury, after which KL Rahul took over the role. However, Shubman Gill was named Rohit's deputy during the tour of Sri Lanka in the summer of 2024. A report in TOI earlier this week hinted that Jasprit Bumrah is likely to named as the vice-captain.

India Champions Trophy squad announcement Live: Certainly. There have been plenty of discussions on Rohit's captaincy, his form and his future in the sports, but all pertaining to red-ball cricket. In a report in My Khel earlier this week, it indicated that Hardik Pandya might be in consideration to replace Rohit as the skipper for Champions Trophy. Although a separate report in Times of India confirmed that Rohit, who led the team to the final in the 2023 ODI World Cup, will remain the skipper.

India Champions Trophy squad announcement Live: The BCCI had made it clear to ICC in October that the Indian team won't be travelling to Pakistan as they did not get a clearance from the Indian government in the wake of the long-standing political tensions between the two countries.

The act sparked quite a back-and-forth between the two cricket boards, with Pakistan, at one point, threatening to back out from the tournament. However, PCB themselves faced the threat of losing hosting rights, especially amid the Islamabad unrest last month.

# संग्रहालयांच्या माध्यमातून सांस्कृतिक श्रीमंतीचे दर्शन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नूतनीकृत डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालयाचे लोकार्पण

● मुंबई, विशाल कारंडे :



एखाद्या शहराची श्रीमंती ही तिथे राहणाऱ्या श्रीमंत लोकांवरून नाही, मोठ्या इमारती वरून नाही तर तेथील संग्रहालयांच्या माध्यमातून दिसून येते. जगातील सर्व चांगल्या शहरांमध्ये उत्तम अशी संग्रहालये आहेत. असेच एक उत्तम संग्रहालय आपण खुले करत असल्याचा मनस्वी आनंद होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. बृहन्मुंबई महापालिकेच्या वतीने नूतनीकरण करण्यात आलेल्या डॉ भाऊ दाजी लाड संग्रहालयाचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

संग्रहालयाच्या माध्यमातून त्या देशाची, शहराची संस्कृती, लोक जीवन आणि इतिहास कळतो, असे सांगून मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, आपला ऐतिहासिक वारसा भावी पिढीला पाहता यावा हा संग्रहालय उभारणीचा उद्देश आहे. आतापर्यंत झालेला विकास आणि त्यासाठी झालेली स्थित्यंतरे भावी पिढीला समजणे आवश्यक आहे. भारत हा जगातील सर्वात जुनी संस्कृती आजही नांदत असलेला एकमेव देश आहे. आपला देश संस्कृतीची खाण आहे. ती आपण जपली पाहिजे, असेही मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले की, डॉ. भाऊ दाजी लाड हे डॉक्टर होते. पण त्यांनी आपले सर्व जीवन समाजासाठी समर्पित केले. ऐतिहासिक ठेवा जपण्यासाठी मोलाचे कार्य केले. त्यांनी या संग्रहालयातील अनेक वस्तू दिल्या आणि गोळाही केल्या. त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून या संग्रहालयास ५० वर्षापूर्वी डॉ. भाऊ दाजी लाड यांचे नाव देण्यात आले. आज ५० वर्षानंतर त्यांच्या नावाचे हेच संग्रहालय नव्या रुपात जनतेसाठी खुले करताना मोठा आनंद होत आहे. पर्यटकांसाठी हे संग्रहालय एक आकर्षण असेल. यातील वस्तू, दुर्मिळ छायाचित्रे या माध्यमातून लोकांना एक वेगळा अनुभव मिळेल.

# अखेर टेंभू सिंचन योजनेचे आवर्तन सुरू, लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना दिलासा

● कडेगाव, नितीन देवळेकर

टेंभू सिंचन योजनेचे आवर्तन अखेर सुरू झाले असून यामुळे कडेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्य कालव्याद्वारे योजनेचे पाणी लवकरच शिवाजीनगर तलावात पोहोचणार आहे. यापुढे मुख्य कालव्यातून हिंगणगाव बुद्रुक तलावात व पुढे खानापूर, आटपाडी आणि सांगोलापर्यंत जाणार आहे.

यामुळे ५५,००० हेक्टर क्षेत्रातील शेतकऱ्यांचे संकट काही प्रमाणात कमी होणार आहे. शेतकऱ्यांनी लांबणीवर पडलेल्या आवर्तनामुळे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईवर सरकारकडे तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली होती. कडेगाव, खानापूर, आटपाडी, सांगोला आदी तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या पिकांना पाण्याअभावी मोठे नुकसान होऊ लागले होते. रब्बी पिके कोमेजून जात होती, तर ऊस व बागायती पिकांसमोरील संकट वाढले होते. शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशाराही दिला होता. शेतकऱ्यांच्या मागणीचा



गांभीर्याने विचार करून योजनेच्या अधिकाऱ्यांनी आवर्तन सुरू केले आहे.

योजनेचा टप्पा क्रमांक १अ मधून कृष्णा नदीचे पाणी सोडले गेले आणि ते टप्पा क्रमांक १ ब मध्ये पोहोचवून खड्या उंचीवरून (६१ मीटर) पाणी उचलून वितरणाची प्रक्रिया सुरू झाली. यासाठी १९५० अश्वशक्तीचे ३३ पंप बसवले गेले आहेत. त्यातील काही पंप सुरू करण्यात आले आहेत. त्यानंतर हे पाणी ८५ मीटर उचलून ६ महाकाय पाइपलाइनद्वारे खांबाळे बोगद्याच्या सुरुवातीस पोहोचवले आहे.

# पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात भाविकांना धक्काबुक्की करणाऱ्या सुरक्षारक्षकांच्या कंपनीला दणका



● सोलापूर, विशाल पाटील : :

विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या भाविक भक्तांना रक्षक कंपनीने नियुक्त केलेले कर्मचारी हे धक्काबुक्की करतात व त्यांना ढकलून देतात, भाविकांशी नम्रतेने न वागणे असे आरोप आणि करारातील अटी-शर्तीचा भंग केल्याकरणी मनुष्यबळ पुरवठा कामाचा रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲड सिस्टम्स प्रा.लि. पुणे यांचा ठेका रद्द केल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. मंदिरे समितीला आऊटसोर्सिंग पद्धतीने कुशल, अर्धकुशल व अकुशल कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक असल्याने विहित प्रक्रिया राबवून ई निविदा राबविण्यात आली होती. त्यामध्ये रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि. पुणे यांची ई निविदा मंजूर होऊन ४ जुलै २०२४ रोजी करारनामा करण्यात आला होता. त्यांच्याकडून अटी व शर्तीचे पालन होत नव्हते. मनुष्यबळ / कर्मचारी पुरवठा कामाबाबत विविध प्रकारच्या लेखी तक्रारी देखील प्राप्त झाल्या होत्या.

# ई रिक्षा चालू ठेऊन बेमुदत उपोषण करा

● माथेरान, फरीद डावरे :

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार माथेरान मध्ये प्रायोगिक तत्त्वावर एकूण २० ई रिक्षा सुरू आहेत. सहा महिन्यांचा हा पायलट प्रोजेक्ट डिसेंबर मध्ये पूर्ण झाला असून उर्वरित ७४ ई रिक्षा सुध्दा लवकरच सुरू व्हाव्यात यासाठी श्रमिक हातरीक्षा चालक मालक संस्थेच्या सदस्यांनी १४ जानेवारी पासुन ई रिक्षा बंद ठेऊन बेमुदत उपोषण करण्याचा निर्धार केला आहे.त्याबाबतचे लेखी पत्र या संस्थेच्या सदस्यांनी कार्यक्षम मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक राहुल इंगळे यांना सादर केले आहे. ही सेवा बेमुदत बंद करण्यात



येणार असल्याचे समजल्यावर पालक वर्गासह नागरिकांमध्ये नाराजीचे सावट पसरले असून यामुळे शालेय विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. फिरावयास येणाऱ्या जेष्ठ पर्यटकांना सुध्दा याचा नाहक त्रास सहन करावा लागणार आहे. नियमितपणे कॉलेजला जाणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सुध्दा या बंदची झळ सोसावी लागणार आहे त्यासाठी या ई रिक्षांची सेवा बंद न करता शालेय विद्यार्थी,रुग्ण आणि आपत्कालीन व्यवस्था म्हणून सुरू ठेवाव्यात. याच ई रिक्षा सुरू होण्यासाठी शालेय विद्यार्थी सुध्दा त्यावेळी रस्त्यावर उतरले होते. तर ई रिक्षांच्या समर्थकांनी सुध्दा यासाठी आपले भरीव योगदान दिले आहे. त्यामुळे उर्वरीत ७४ हातरीक्षा चालकांना या ई रिक्षा मिळाव्यात ही त्यांची मागणी जरी योग्य असली तरी सुद्धा शालेय विद्यार्थ्यांना आणि रुग्णांना वेठीस धरू नका त्यांना नियमितपणे ही सेवा उपलब्ध करून द्यावी. ह्या ७४ हातरीक्षा चालक मालकांनी बिनधास्तपणे उपोषणाचे हत्यार हाती घ्यावे.

> ■ आम्ही आता दोन दिवस माथेरान मध्ये मुक्कामी आहोत. आम्हाला असे समजले आहे की या ई रिक्षांची सुविधा १४ जानेवारी पासून बेमुदत बंद करणार आहेत. आमचे रिलेटिव्ह सुध्दा माथेरान फिरावयास १४ तारखेला येणार आहेत त्यांना आम्ही सांगितले आहे की इथे वाहतुकीची सुविधा ई रिक्षामुळे छान झाली आहे पण जर का हे बंद वगैरे होणार असेल तर दुसरीकडे फिरावयास गेलेलेच बरे.
>
> **- मयांक भानुशाली- पर्यटक मुंबई**

# नवी मुंबईतल्या परवडणाऱ्या घरांच्या किमती अखेर जाहीर



● नवी मुंबई, भावना जैन :

गेल्या काही दिवसांपासून उत्सुकता प्रचंड ताणल्या गेलेल्या सिडकोच्या घरांच्या किमती अखेर जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे नवी मुंबईत परवडणाऱ्या दरात घर खरेदीचं स्वप्न उराशी बाळगून विनंती अर्ज करणाऱ्या लाखो अर्जदारांना आता आपलं आर्थिक गणित निश्चित करायला मदत होणार आहे. सिडकोच्या एकूण २६ हजार घरांच्या सोडत प्रक्रियेसाठी आत्तापर्यंत जवळपास एक लाखाहून अधिक अर्ज सादर झाले आहेत. आता त्या घरांच्या किमती जाहीर झाल्यामुळे अर्जदारांची प्रतीक्षा संपली आहे. सिडकोची ही २६ हजार घरं आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (वार्षिक उत्पन्न ६ लाखांपर्यंत) व अल्प उत्पन्न गटाकरता (वर्षिक उत्पन्न ६ लाखांपेक्षा जास्त) नवी मुंबईच्या वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली नोड परिसरात उपलब्ध आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटासाठीच्या घरांच्या किमती २५ लाखांपासून ४८ लाखांपर्यंत असतील.

### आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) गट

- ■ तळोजा सेक्टर २८ – २५.१ लाख
- ■ तळोजा सेक्टर ३९ – २६.१ लाख
- ■ खारघर बस डेपो – ४८.३ लाख
- ■ बामनडोंगरी – ३१.९ लाख
- ■ खारकोपर २ए, २बी – ३८.६ लाख
- ■ कळंबोली बस डेपो – ४१.९ लाख

### अल्प उत्पन्न घटक (LIG) गट

- ■ पनवेल बस टर्मिनस – ४५.१ लाख
- ■ खारघर बस डेपो – ४८.३ लाख
- तळोजा सेक्टर ३७ – ३४.२ लाख ते ४६.४ लाख
- ■ मानसरोवर रेल्वे स्थानक – ४१.९ लाख
- ■ खांदेश्वर रेल्वे स्थानक – ४६.७ लाख
- ■ खारकोपर पूर्व – ४०.३ लाख
- ■ वाशी ट्रक टर्मिनल – ७४.१ लाख
- ■ खारघर स्थानक सेक्टर १ए – ९७.२ लाख

# नागपूर, पुणे, मुंबईकरिता स्लीपर वंदे भारत एक्स्प्रेस

● नागपूर, नितीन देवळेकर :



वंदे भारत एक्स्प्रेस ही भारतीय रेल्वेची महत्वाची आणि प्रमुख रेल्वेगाडी असून सर्वत्र या गाडीची मागणी आहे. लांब पल्ल्याच्या प्रवासाकरिता स्लीपर वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. मध्य रेल्वेच्या विभागाने नागपूर ते पुणे आणि नागपूर ते मुंबई या मार्गावर स्लीपर वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करण्याचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे सादर केला आहे. वंदे भारत एक्स्प्रेस सर्व अत्याधुनिक सुविधांनी युक्त गाडी आहे. देशभरात सर्वत्र या गाडीची मागणी आहे. ही गाडी पाच ते सात तासांच्या प्रवासाकरिता आहे. त्यापेक्षा अधिक लांबच्या प्रवासाकरिता स्लीपर वंदे भारत एक्स्प्रेस येत आहे. या गाडीच्या डब्यांची निर्मिती होत आहे. देशभरातील रेल्वेच्या सर्वच विभागाने ही त्यांच्या विभागात सुरू करण्याची मागणी केली आहे. आम्हीसुद्धा महाराष्ट्रातील तीन महत्वाच्या शहरादरम्यान अशी गाडी चालवण्यासाठी आग्रही आहोत. नागपूर-पुणे आणि नागपूर-मुंबई दरम्यान स्लीपर वंदे भारत सुरू करण्याता यावी, असा प्रस्ताव नागपूर विभागाने रेल्वे बोर्डाकडे सादर केला आहे. परंतु नवीन गाड्या सुरू करण्याचा निर्णय सर्वस्वी रेल्वेबोर्डाचा असतो, अशी माहिती मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे नवनियुक्त विभागीय व्यवस्थापक विनायक गर्ग यांनी दिली. नागपूर- सिकंदराबाद, नागपूर ते इंदूर आणि नागपूर बिलासपूर वंदे भारत एक्स्प्रेस सुरू आहेत. इंदूर आणि बिलासपूर वंदे भारत एक्स्प्रेसला उत्तम प्रतिसाद आहे. सिकंदराबाद एक्सप्रेसला हवा त्या प्रमाणात प्रतिसाद नाही. ही गाडी सव्वासात तास वेळ घेते. दक्षिण भारताला जोडणारी ही महत्वाची गाडी असून २० डब्यांची आहे. देशातील काही निवडक शहरादरम्यान २० डब्यांची गाडी आहे. बहुतांश ठिकाणी आठ डब्यांची गाडी आहे. सिकंदराबाद वंदे भारत एक्स्प्रेसचेदेखील आठ डबे करण्याचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे पाठवण्यात आला आहे, असेही ते म्हणाले.

# ठाणे जिल्ह्यातील निर्यात प्रोत्साहनासाठी आयोजित महाराष्ट्र निर्यात संमेलन २०२४-२५ संपन्न

● ठाणे, सम्यक कासारे :






ठाणे जिल्ह्यातील निर्यात प्रोत्साहनासाठी ठाणे जिल्हा उद्योग केंद्र यांच्यामार्फत दि. ७ जानेवारी रोजी आयोजित "महाराष्ट्र निर्यात संमेलन २०२४-२५" जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे यशस्वीपणे संपन्न झाले.

या संमेलनामध्ये २८३ हून अधिक सहभागींनी भाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे (भा.प्र.से.) हे होते. त्यांच्यासह उद्योग सहसंचालक, कोकण विभाग श्रीमती विजू शिरसाठ यादेखील उपस्थित होत्या.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी निर्यात क्षमता, निर्यातीतील वाढ आणि निर्यातीला चालना देण्यासाठी सीमाशुल्क विभाग, डीजीएफटी आणि विविध ईपीसी यांच्या प्रमुख भूमिकेसह निर्यातीला चालना देण्यासाठी रोड मॅपबाबत मार्गदर्शन केले.

कोकण विभागाच्या उद्योग सहसंचालक श्रीमती विजू शिरसाठ यांनी ओडीओपी आणि निर्यात प्रोत्साहन, जिल्हा म्हणून निर्यात केंद्र आणि महाराष्ट्रातील विविध निर्यात उपक्रम, महाराष्ट्राचे निर्यात धोरण आणि त्यातील प्रोत्साहनांसह १० सूत्री अजेंडा आणि BRAP अंतर्गत निर्यातीतील मूळ जिल्हा याबाबत सविस्तर माहिती दिली.

जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक श्रीमती सोनाली देवरे यांनी ठाणे जिल्ह्याची सद्य:स्थिती आणि निर्यात प्रोत्साहनासाठी अधिवेशनाचे महत्त्व याविषयी सुरुवातीचे भाष्य केले. तसेच सत्रादरम्यान, त्यांनी जिल्ह्याच्या ओडीओपी उपक्रम आणि डीआयसी योजना आणि जिल्ह्याच्या निर्यात कृती आराखड्यासह क्लस्टर डेव्हलपमेंट आणि राष्ट्रीय ओडीओपी पुरस्कारांची माहिती दिली.

या परिषदेत DGFT चे उपसंचालक श्री.गोपाल मिश्रा, कस्टम विभागाचे सहआयुक्त श्री.अर्शदीप सिंग, अधीक्षक श्री.वैभव मिश्रा, ईईपीसीचे प्रादेशिक संचालक श्री.सी.एच. नदीगर, FIEO च्या व्यवस्थापन कार्यकारी श्रीमती रिशु मिश्रा, केमिक्सिल डीजी श्री.रघुवीर किणी, उद्योग महासंघाचे अध्यक्ष श्री.भालचंद्रसिंह राव राणे, COSSIAचे सरचिटणीस श्री. जयवंत निनाद, ॲड अंबरनाथचे अध्यक्ष श्री.तायडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या निपुणतेसह त्यांच्या निर्यातीतील विभागाची भूमिका स्पष्ट केली आहे, डीजीएफटी आणि कस्टम विभागाने जिल्ह्यातील निर्यात प्रोत्साहन संभाव्य क्षेत्रे, संधी, पाळल्या जाणाऱ्या कार्यपद्धती, शिपमेंट हाताळण्याचे मार्ग, संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत वेळेवर पोहोचण्याचा दृष्टीकोन स्पष्ट केला. निर्यात संबंधित समस्या आणि SCOMET धोरणाबाबत. FIEOच्या व्यवस्थापन कार्यकारी श्रीमती रिशु मिश्रा यांनी FIEO द्वारे जिल्ह्याच्या ओडीओपीसह निर्यात प्रोत्साहनासाठी समर्थन स्पष्ट केले. अभियांत्रिकी EPC's, Chemexil EPC's ने हँडहोल्डिंग सपोर्टसह त्यांच्याद्वारे प्रदान केलेल्या विशिष्ट निर्यात क्षेत्रातील समर्थनाबद्दल स्पष्ट केले आहे इंडिया पोस्टचे मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह श्री.सुंदर राव यांनी निर्यातीत भारतीय पोस्टाच्या योजनांबाबत माहिती दिली.